भाग पाचवा


१९९६
म. ग्रं. सं. ठाणें
विषय भू. प्रवास
सं. क्र. ३८१





# आपले देव आपली दैवते





REFBK-0015828
REFBK-0015828

शं. रा. देवळे

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम
वि:
ग्रंथ संग्रहालय ठाणे



REFBK-0015828

# आपले देव, आपली दैवते : ५

शंभूराव रामचंद्र देवळे

श्री लेखन वाचन भांडार, पुणे २

किंमत दोन रुपये

प्रकाशक :
ग. ल. ठोकळ
ठोकळ प्रकाशन,
ठोकळभवन, लक्ष्मीरस्ता,
पुणे २.

© शं. रा. देवळे
७८ शुक्रवार, पेठ,
आफळेवाडा, पुणे २.

आवृत्ती पहिली : १९६६

मुद्रक :
मा. ह. पटवर्धन
संगम प्रेस प्रा. लि.,
३८३ नारायण पेठ,
पुणे २.

# आपले देव, आपली दैवते

भारतातील तीर्थे आणि क्षेत्रे ही भारतीय एकात्मतेची प्रतीके आहेत. वेदाकाळापासून आजपर्यंत भारतीय जनतेने तीर्थक्षेत्रांविषयीची आपली श्रद्धा उत्कटतेने राखली आहे. नाना वंश, जाती, भाषा, भू-विशेष इत्यादींनी गजबजलेला विविधतापूर्ण असा भारत देश एकात्म असल्याची जाणीव अखंड राखण्यात या तीर्थक्षेत्रांविषयीच्या श्रद्धेचा वाटा फार मोठा आहे. चारी धामे, सप्तपुऱ्या, सप्तकुलपर्वत, सप्तसरिता, शक्तिपीठे, बारा ज्योतिर्लिंगे इत्यादी विविध पंथानुयायांची पवित्र स्थाने हिमालयापासून कन्याकुमारीपर्यंत आणि जगन्नाथपुरीपासून द्वारकेपर्यंत सर्व भारतभर विखुरलेली आहेत.

भारतीय एकात्मतेच्या या जागत्या केंद्रांचा परिचय घडविण्यासाठीच 'आपले देव, आपली दैवते' या मालेची योजना आहे. हा ऐतिहासिक-सांस्कृतिक विषय प्रसादपूर्ण व परिणामकारक भाषेत मांडावा असा हेतू होता आणि ते काम या मालेचे लेखक श्री. शं. रा. देवळे यांनी चांगल्या प्रकारे केले आहे, या मताशी वाचकही सहमत होतील.

या मालेच्या पहिल्या भागात तुळजापुरची भवानी, वणीची सप्तशृंगी देवी कार्ल्याची एकवीरा, आंब्याची योगेश्वरी व नेवाशाची म्हाळसा–मोहिनी ही देवीक्षेत्रे आणि शिखर–शिंगणापूरचा शंभू महादेव, पालीचा खंडोबा, पंढरीचा पांडुरंग ही हरिहरांची लीलाक्षेत्रे यांचा परिचय घडविलेला असून मोरयागोसावी व समर्थ रामदास या सत्पुरुषांच्या निवासाने पावन बनलेल्या अनुक्रमे चिंचवड व शिवथरघळ या स्थानांचेही दर्शन घडविले आहे.

दुसऱ्या भागात खंडोबाच्या भक्तांना अत्यंत प्रिय असलेली जेजुरी, आदिशक्ति रेणुकेच्या आणि दत्तात्रेयाच्या निवासामुळे माहात्म्य पावलेले माहूर,

दक्षिण-काशी म्हणून प्रख्यात असलेले कोल्हापूर, उन्मत्त क्षत्रियांचा मद उतरविणाऱ्या परशूरामाचे चिपळूण आणि 'मंगेश' नावाने गोमंतकात गाजत असलेल्या शंकराचे स्थान मंगेशी या देवताक्षेत्रांबरोबरच ज्ञानेश्वर, एकनाथ, नरसिंह सरस्वती व तुकाराम या संतांच्या पदस्पर्शाने चैतन्यमय बनलेल्या आळंदी, पैठण, नरसोबाची वाडी व देहू या संतक्षेत्रांची वर्णने समाविष्ट आहेत. या पहिल्या दोन भागांत महाराष्ट्रातील पवित्र स्थानांचा परिचय आहे आणि पुढील तीन भागांत महाराष्ट्राबाहेरील भारतीय क्षेत्रांचा परिचय आहे.


तिसऱ्या भागात कन्याकुमारी, मदुरा, गोकर्ण महाबळेश्वर आणि श्रवण बेळगोळ ही दक्षिण भारतातील क्षेत्रे, द्वारका हे पश्चिमेकडील क्षेत्र, भुवनेश्वर व जगन्नाथपुरी ही पूर्वेकडील क्षेत्रे आणि प्रयाग व हरिद्वार ही दोन उत्तरेकडील क्षेत्रे यांची शब्दयात्रा घडविली आहे.

या चौथ्या भागात दक्षिणेतील प्रसिद्ध देवस्थान तिरुपती, शिवकांची आणि विष्णुकांची, भगवान् रामचंद्राच्या वास्तव्याने पुनीत झालेले चित्रकूट आणि अयोध्या, भगवान् कृष्णाचे जन्मस्थान गोकुळ वृंदावन, तसेच गया आणि सिद्धपूर (मातृगया) ही ठिकाणे आली आहेत.

पाचव्या भागात अमरनाथ, अमरकंटक, कोणार्क, गिरनार, अमृतसर, चिदंबरम्, अरुणाचलम्, डाकोर, कामाख्या इत्यादी प्रमुख क्षेत्रांचा परिचय करून दिला आहे.

या पाच भागांशिवाय शिवभक्तीच्या जागत्या ज्योती जेथे अखंड उजळलेल्या आहेत अशा ज्योतिर्लिंगांचे दर्शन घडविणारे 'बारा ज्योतिर्लिंगे' हे स्वतंत्र पुस्तक प्रकाशित झाले असून, विघ्नहर्त्या विनायकाच्या उपासकांना प्रिय असलेल्या अष्टविनायकक्षेत्रांचा परिचय असाच स्वतंत्र पुस्तकरूपाने लवकरच वाचकांच्या सेवेस सादर करण्याचा संकल्प आहे. अष्टविनायक पुस्तक प्रकाशित झाल्यानंतर या सात पुस्तकांच्या मालेतून मराठी वाचकांना भारतातील महत्त्वपूर्ण अशा बहुतेक सर्व तीर्थक्षेत्रांची सर्वांगीण माहिती एकत्र मिळण्याची सोय होईल. वाचकांना आमचा हा प्रयत्न आवडेल अशी आशा आहे.

— प्रकाशक



भक्तांसाठी युगे अठ्ठावीस
विटेवरी उभे राहणाऱ्या परब्रह्माच्या
चरणकमली भक्तिभावपूर्वक
समर्पण.

शं. रा. दे.

# अनुक्रम


| | | |
|---|---|---|
| १. अमरनाथ | ... | ९ |
| २. अमृतसर | ... | २३ |
| ३. अमरकंटक | ... | ३५ |
| ४. गिरनार | ... | ४४ |
| ५. डाकोर | ... | ५४ |
| ६. अरुणाचलम् | ... | ६४ |
| ७. चिदंबरम् | ... | ७५ |
| ८. कोणार्क | ... | ८९ |
| ९. कामाख्या | ... | १०१ |
| □ संदर्भ ग्रंथ | ... | ११२ |

।। श्री ।।

आपले देव आणि आपली दैवते या मालेचा हा पाचवा भाग आज प्रकाशित होत आहे. हे पाच भाग व बारा ज्योतिर्लिंगे हे सहावे पुस्तक. यातून भारतातील सुमारे साठ प्रसिद्ध तीर्थक्षेत्रांचा परिचय करून दिला आहे. पवित्र स्थळांना भेटी देण्याची व ती श्रद्धेने, जिज्ञासेने आणि थोड्याफार चिकित्सक बुद्धीने पाहण्याची सवय मला माझे आजोबा कै. विष्णु बाळकृष्ण देवळे आणि कै. विठ्ठल बाळकृष्ण देवळे यांच्या सहवासात लागली. यातील बऱ्याच ठिकाणचा प्रवास त्यांच्यामुळे घडला. भारतप्रवासी भाईसाहेब काळे यांच्या बरोबर काही ठिकाणे पाहिली. माझे स्नेही श्री. रं. म. जोशी निर्मळ व श्री. ना. स. ( नाना ) करंदीकर यांचा सहवास प्रवासात काही ठिकाणी घडला. पुस्तके तयार करताना माझे ज्येष्ठ स्नेही श्री. रामचंद्र चिंतामण ढेरे यांचे मार्गदर्शन मिळाले. ही पुस्तके ' लेखन वाचन भांडार 'चे श्री. दादासाहेब ठोकळ यांनी प्रकाशनास स्वीकारली. चित्रकार श्री. ग. वि. देशपांडे आणि श्री. म. वि. सोवनी यांनी सुबक रेखाचित्रे करून ती सजविली. अनेक श्रेष्ठ लेखकांच्या हिंदी, मराठी, इंग्रजी आणि गुजराती संदर्भ पुस्तकांचे साहाय्य मला झाले. या सर्वांच्या कृपेमुळेच माझ्या हातून हे काम झाले. या सर्वांचा मी ऋणी आहे. माझा प्रयत्न वाचकांना आवडेल अशी आशा करतो.

*—शं. रा. देवळे*


हिंदुस्थान
काही तीर्थक्षेत्रे
अमरनाथ
पश्चिम पाकिस्तान
अमृतसर
केदारनाथ
हरिद्वार
दिल्ली
मथुरा
गोकुळ
वृन्दावन
अयोध्या
प्रयाग
काशी
गया
चित्रकूट
अबू
सिध्दपूर
उज्जयिनी
डाकोर
द्वारका
गिरनार
सोमनाथ
ओंकारमांधाता
अमरकंटक
पूर्व पाकिस्तान
कामाख्या
कलकत्ता
भुवनेश्वर
कोणार्क
जगन्नाथपुरी
त्र्यंबकेश्वर
भीमाशंकर
वेरूळ
औंढ्या नागनाथ
परळीवैजनाथ
मुंबई
श्रीशैल मल्लिकार्जुन
तिरुपती
श्रवण बेळगोळ
गोकर्ण महाबळेश्वर
कांची
मद्रास
अरुणाचलम
चिदंबरम
मदुरा
रामेश्वर
कन्याकुमारी
लंका

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ..........  दि: ..........
..........  नों. दि: ..........
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ..........

# १ : अमरनाथ

आपल्या भरतभूमीचे शिरोभूषण असलेला हिमालय हा एक महान देवभूमी म्हणून प्रसिद्ध आहे. हिमालयात जाऊन तपःसाधना करणारे कितीतरी लोक होते आणि आहेतही. हिमालयातील शेकडो पवित्र स्थळांची यात्रा करून पुण्य मिळविणे म्हणजे आपल्या जीवनाचे सार्थक करणे होय, अशी आपली पवित्र श्रद्धा आहे.

रामेश्वर–कन्याकुमारीपासून तो थेट काशी बद्रि-नारायणपर्यंत लाखो लोक सतत यात्रा करतात. पण त्या यात्रांपेक्षाही अमरनाथाची अवघड यात्रा करून स्वतःचे जीवन पावन करणारे लोक थोडे थोडके नाहीत.

अमरनाथाची यात्रा म्हणजे आपल्या आयुष्यातील एक थोर पावन यात्रा आहे. अमरनाथ हे पवित्र क्षेत्र काश्मीर प्रदेशात आहे. म्हणूनच ही यात्रा करण्यात एकाच वेळी दोन फायदे आपणांस मिळतात, एक तर अमरनाथाचे म्हणजे भगवान शंकराच्या स्वयंभू हिमलिंगाचे दर्शन आणि दुसरे काश्मीरसारख्या सुंदर प्रदेशाचे–भूमीवरील नंदनवनाचे दर्शन !

" काश्मीरची भूमी ही प्रत्यक्ष पार्वतीच असून तेथील राजा हा शिवाचा अंश आहे." असे कल्हण या कवीने आपल्या राजतरंगिणी या ग्रंथात म्हटले आहे.


काश्मीरची दरी 'सतीसारस' या नावाने प्रसिद्ध असून अद्यापही तेथे "सतीसारस" नावाचा एक प्रचंड तलाव आहे. प्राचीन काळी या तळयाच्या काठी राहणाऱ्या माणसांना राक्षसांनी वारंवार त्रास दिला. तेव्हा कश्यप ऋषींनी त्या राक्षसांचा पुढारी जो जलोद्‌भव राक्षस त्याला ठार केले आणि ती भूमी आपल्या ताब्यात घेतली. तेव्हापासून या भूमीला 'काश्यपमंडल' किंवा 'काश्मीर-मंडळ' असे नाव मिळाले.

कश्यप हे ब्रह्मदेवाचे नातू ! त्यांच्या या पवित्र भूमीत चक्रभृत विष्णू आणि विजयेश शिव यांनी वस्ती केली आणि काश्मीरदरीचा सारा भाग पवित्र तीर्थमय झाला.

काश्मीरातील पर्वत सतत बर्फाच्छादित असतात. अशाच एका अत्यंत उंच पर्वतदरीत अमरनाथ महादेवांनी वास्तव्य केले आहे.

अमरनाथाची यात्रा करण्यासाठी दरवर्षी श्रावण शुद्ध पंचमीला श्रीनगर येथून यात्रिकांचा मोठा मेळावा निघतो. श्रीमत् शंकराचार्यांच्या काश्मीरमधील शारदापीठाच्या नेतृत्वाखाली हजारो साधू, संत, महंत, बैरागी, संन्यासी वगैरे लोकांचे जथे या मेळाव्यात असतात. या यात्रेला काश्मीरच्या सरकारकडून हरप्रकारची मदत मिळते. नोकरवर्ग, दवाखाने, पोलीस संरक्षण, तंबू, राहुटया वगैरे सुखसोयींमुळे सर्व यात्रिकांची व्यवस्था उत्तम ठेवली जाते.

श्रीनगरहून आग्नेयीस सुमारे पंधरा किलोमीटर अंतरावर पांपुर या ठिकाणी हा मेळावा प्रथम येतो. पांपुरचा परिसर केशराच्या मळचांविषयी प्रसिद्ध आहे. शरदपौर्णिमेच्या सुमारास केशराचा हंगाम असतो. तेथील वातावरण सतत सुगंधित असते. यात्रिकांचा हा मेळावा पांपुरचा मुक्काम आटोपून पुढे पंधरा किलोमीटर अंतरावरील अवंतीपूर येथे पोहचतो.



शंकराचार्य टेकडीवरील शंकराचार्यमंदिर
हे एक हजार फूट उंच असलेल्या टेकडीवर आहे. शंकराचार्य येथे काही काळ राहिले म्हणून ही शंकराचार्य टेकडी. मंदिर मात्र त्यापेक्षा जुन्या काळातले आहे.

अवंतीपूरनंतर ब्रिजबीहर आणि तेथून अनंतनाग या ठिकाणी हा मेळावा

थांबतो. अनंतनाग हे एक मोठे केंद्र आहे. तेथे अनेक लोक अमरनाथ यात्रेसाठी या मेळाव्यात येऊन मिळतात. हे ठिकाण समुद्रसपाटीपेक्षा सोळाशे मीटर उंचीवर आहे.

अनंतनागापासून अमरनाथकडे मोठा रस्ता जातो. गौतमनागच्या झऱ्यावरून सर्व यात्रिक मार्तण्ड क्षेत्रास जातात. मार्तण्ड हे क्षेत्र सूर्योपासनेसाठी प्रसिद्ध आहे. तेथे सूर्यपूजा आणि श्राद्धविधी करतात. अमरनाथचे पंडचे या ठिकाणी यात्रेकरूंची चौकशी करून त्यांच्या यात्रेची व्यवस्था करतात. मार्तण्ड क्षेत्र हे अत्यंत सुंदर क्षेत्र आहे. त्याच्या परिसरात निसर्गरम्य देखाव्यांची रेलचेल आहे.


काश्मीरचा राजा ललितादित्य याने मार्तण्ड क्षेत्राजवळ इसवी सनाच्या आठव्या शतकात एक अत्यंत सुंदर आणि भव्य मंदिर बांधले. त्या मंदिराला चौऱ्यांशी खांब असून काश्मीरच्या शिल्पकलेचे हे एक महान प्रतीक आहे.

मार्तण्ड क्षेत्राहून यात्रेकरू निघाल्यानंतर गणेशपूर येथील ' मार्तण्ड कॅनाल वर्क्स 'ची कचेरी व तेथील कार्य पाहून पेहेलगाम या गावी येतात. हे ठिकाण २१६० मीटर उंचीवर आहे. या ठिकाणी लंबोदरी व शेषनाग नदीच्या संगमावर स्नान करण्याचे पुण्य विशेष मानतात. श्रावण शुद्ध दशमीला हा सोहळा मोठ्या थाटाचा असतो.

पेहेलगाम हा गाव अमरनाथ यात्रेचा महत्त्वाचा टप्पा आहे. कारण येथून पुढे यात्रेकरूंना उंच चढाची यात्रा पायीपायीच करावी लागते. पेहेलगाम हे हिमाच्छादित पर्वतराजीत वसलेले असून येथील निसर्ग नयनमनोहर आहे.

अमरनाथच्या पायी यात्रेसाठी या गावी कंडी, दंडी,

घोडे, हमाल, तंबू वगैरे साहित्य मिळते. ही सर्व तयारी करण्यास यात्रेकरू या ठिकाणी दोन दिवस तरी राहतात. येथे एका टेकडीवर मामलेश्वर महादेवाचे एक प्राचीन मंदिर आहे. मामलेश्वराचे दर्शन घेऊन अमरनाथ यात्रेला पायी निघतात.



अनंतनाग

पेहेलगामहून सुमारे पंधरा किलोमीटर अंतरावर चंदनवाडी हे पहिल्या मुक्कामाचे ठिकाण आहे. तीन हजार मीटर उंचीवरील या ठिकाणापासून हिमालयाचे दर्शन घडते. येथे सगळीकडे गवताचे गालिचे पसरले आहेत, असे रम्य दृश्य दिसते.

त्यानंतर पिसुघाटीचा अत्यंत अवघड चढ चढून जाताना यात्रेकरूंची हाडे पिसून जातात. या ठिकाणी पूर्वी देवांनी

राक्षसांचा नाश केला आणि त्या राक्षसी हाडांचा प्रचंड ढीग येथे रचला असे सांगतात. त्यानंतर जाजवलच्या ओसाड आणि थंड भागातून पुढे गेल्यावर 'कुट्टाघाटी' चढावी लागते. चौपानोचे सपाट मैदान दिसताच यात्रेकरू तेथे विश्रांती घेतात.

आता काश्मीरातील पुराणप्रसिद्ध जे शेषनागतळे, त्या तळ्याजवळ यात्रेकरू येतात. साडेतीनशे मीटर उंचीवरील या प्रदेशात रस्त्याच्या खाली सुमारे दीडशे मीटर खोलीवर हे तळे आहे. जणू काय हे तळे पाताळातच आहे असे वाटते. शेषनागाची वस्ती असलेला हा तलाव आहे. या तलावासंबंधीची एक कथा प्रसिद्ध आहे ती अशी :

वितस्ता नदीच्या काठी एका सुंदर बागेतील तळ्याजवळ सुश्रवस नावाचा नाग राहत होता. त्याला इंद्रवती आणि चंद्रलेखा या दोन कन्या होत्या. विशाख नावाच्या एका ब्राह्मणाने त्या सुश्रवस नागाला एकदा एका संकटात सहाय्य केले. त्या उपकाराची फेड म्हणून सुश्रवसाने आपली मुलगी चंद्रलेखा त्या विशाख ब्राह्मणाला दिली.

त्या काळात काश्मीरचा राजा नर हा आपल्या किनारग्राम राजधानीत मोठ्या मजेत राहत होता. विशाख ब्राह्मण आणि त्याची पत्नी चंद्रलेखा हे जोडपेही त्याच किनारग्रामात राहत असे. चंद्रलेखेचे सौंदर्य पाहून नरराजा मोहित झाला. तिला आपलीशी करण्याचे त्याने खूपच प्रयत्न केले. पण त्यात त्याला यश मिळाले नाही. राजाच्या त्रासाला कंटाळून विशाख व चंद्रलेखा सुश्रवसकडे आली.

सुश्रवस नागाला नरराजाचे ते दुष्ट कारस्थान कळताच

तो खूपच संतापला. त्याने नरराजाचा आणि त्याबरोबरच त्याच्या किनारग्राम राजधानीचा संपूर्ण नाश केला. दुष्ट राजाबरोबर निष्पाप लोकांचाही आपण बळी घेतला, या गोष्टीचे सुश्रवसला दुःख झाले आणि मग त्याने वैतागाने आपले वितस्ताकाठचे निवासस्थान सोडून दिले. त्याने दूरच्या पर्वतावर एक तळे तयार केले आणि तो तेथे राहू लागला. सुश्रवस नागाचे तळे म्हणजेच शेषनाग तळे. या तळ्याचे पाणी दुधाप्रमाणे पांढरे शुभ्र भासते.

दुग्धाब्धिधवलं तेन सरो दूरागिरौ कृतम् ।
अमरेश्वरयात्रायां जनैरद्यापि दृश्यते ।।

असा श्लोक यासंबंधी काश्मीरच्या प्रसिद्ध कल्हण या कवीने आपल्या राजतरंगिणी या काव्यात लिहून ठेवला आहे. श्रावणी पौर्णिमेच्या रात्री बारा वाजता या तळ्यात शेषनागाचे प्रत्यक्ष दर्शन होते असे म्हणतात.

सुश्रवसने आपली मुलगी व जावई यांच्यासाठी तयार केलेले जामत्री नावाचे तळेही तेथे जवळच आहे.

शेषनाग तळ्याचा सुंदर परिसर पाहून आणि त्याच्या सभोवतालच्या ब्रह्मा-विष्णू-महेशांच्या तीन बर्फाच्छादित टेकड्यांचे दर्शन घेऊन सारे यात्रेकरू पुढे जातात.

तीन हजार सातशे मीटर उंचीवर वावजन नावाचा एक टप्पा आहे. या उंच ठिकाणी भयंकर वेगाचा वारा वाहत असतो. हिमनद्यांचे पूल ओलांडीत आणि अवघड उभा चढ चढून जात पाचशे मीटर उंचीचा भाग चढून यात्रेकरूंना 'महागुनस' नावाची खिंड ओलांडावी लागते.

हा खडा चढ चढताना सर्वांना दम लागतो. तेथील सारा भाग बर्फमय असतो. तेथे प्राणवायूही कमी असतो.


महागुनस खिंड ओलांडल्यावर एकदम उताराचा रस्ता आहे. त्या बर्फाळ उतारावरून फारच जपून उतरावे लागते. लोखंडी अणकुचीदार मायणी बसविलेल्या गरुड काठ्यांचा उपयोग या ठिकाणी सर्व यात्रेकरूंना करावा लागतो. पुढील रस्त्यावर थोडी हिरवळ आणि खुरटी फुलझाडे पाहून सर्वांना प्रसन्नता येते. लवकरच 'पंचतरणी' चा टप्पा येतो.

पंचतरणीचे मैदान ऐसपैस आहे. तेथे यात्रेकरूंना राहण्यासाठी सीमेंटच्या खोल्या बांधल्या आहेत. हा भाग खूपच सुंदर दिसतो. तेथे एक मोठी नदी असून तिला डोंगरावरून खळखळत येणारे चार प्रवाह मिळतात. त्या पाच नद्यांच्या संगमाचे हे पवित्र तीर्थ म्हणजेच पंचतरणी !

भगवान शंकर या ठिकाणी एकदा तांडवनृत्यात इतके रंगून गेले की त्यांच्या माथ्यावरील जटाजूट मुक्त होऊन त्यातील गंगा बाहेर पडली. तिच्या पाच धारा वाहू लागल्या आणि मग हे स्थळ पंचतरणी या नावाने प्रसिद्ध झाले. या पाच नद्यांच्या पाण्यावरच अमरनाथाची गुंफा असलेला पर्वत तरंगत आहे असे म्हणतात. येथील स्नान फारच पुण्यप्रद मानतात.

पंचतरणी येथील निवासस्थानी आपले सामान ठेवून यात्रेकरू लोक पुढे सुमारे सहा सात किलोमीटर अंतरावर अमरनाथ गुहेकडे जातात. हा सर्व रस्ता नागमोडी वळणांचा

असून बर्फमय असतो. बर्फाच्या रस्त्यावरून चालत जावे लागते.



अमरनाथ गुहा

अमरनाथाची गुहा समुद्रसपाटीपासून सुमारे पाच हजार मीटर उंचीवर आहे. या गुहेभोवतालच्या डोंगरमाथ्यावर सतत बर्फ असते. एका पर्वताच्या दोन जवळजवळच्या शिखरांमध्ये ही विशाल गुहा निसर्गानेच निर्माण केलेली आहे. याच गुहेत बर्फमय शिवलिंग असून तोच अमरनाथ आहे.

पर्वताच्या पायथ्याशी झुळझुळ वाहणाऱ्या अमरगंगेच्या थंड पाण्यात स्नान करून आणि त्या नदीच्या पात्रातील पांढरी चुनखडी माती अमर विभूती म्हणून अंगाला फासून

यात्रेकरू अमरनाथाच्या दर्शनास जातात.


पायात चामड्याची पादत्राणे न घालता गवत अथवा लोकर गुंडाळून दहापंधरा पायऱ्या चढून जाऊन अमरनाथाच्या गुहेत जावे लागते. ही गुहा खूपच विस्तीर्ण आहे.

गुहेच्या उत्तरेकडील भिंतीला एक मोठे छिद्र आहे. त्या छिद्रातून पाण्याचे थेंब टपकत असतात. त्याच थेंबांचे बर्फ बनून त्याचे शिवलिंग तयार होते. हा क्रम सतत चालत असतो. मात्र चमत्कार असा की, अमावास्येपासून पौर्णिमेपर्यंत म्हणजे शुद्ध पक्षात हे शिवलिंग सारखे वाढत वाढत जाऊन सुमारे पुरुषभर उंचीचे होते आणि नंतर पौर्णिमेपासून अमावास्येपर्यंतच्या वद्य पक्षात ते हळू हळू कमी कमी होत संपूर्ण विरून जाते. अकबर बादशाहाचा कारभारी अबुल फजल् याने आपल्या 'ऐने अकबरी' या ग्रंथातही ही आख्यायिका नमूद केली आहे. ही गुहा दक्षिणाभिमुखी असल्याने सूर्याची किरणे प्रत्यक्ष अमरनाथाच्या लिंगावर पडत नाहीत. त्यामुळे उन्हाळ्यातसुद्धा अमरनाथाचे लिंग वितळून जात नाही.

श्रीअमरनाथाच्या या बर्फमय लिंगाखेरीज आणखीही अशा थेंबाथेंबांनी वाढणाऱ्या काही बर्फमय मूर्ती त्या गुहेत आहेत. त्यांपैकी गणेश आणि पार्वती यांचे बर्फमय उंचवटे फार पवित्र मानतात. अमरनाथाचे बर्फमय लिंग पांढरे शुभ्र नसून त्यात निळसर छटा दिसते आणि त्याच्या दर्शनाने एक प्रकारचा विशेष आनंद होतो. नास्तिकालाही आस्तिक करणारा हा चमत्कार आहे.

अमरनाथ लिंगाला प्रदक्षिणा घालता येत नाही.

अमरेश्वराच्या दिव्य ज्योतिर्लिंगांचे दर्शन घेऊन यात्रेकरूंना तेथून लगेच परतावे लागते. तेथे कोणालाही निवास करण्याची परवानगी नाही. श्रावणी पौर्णिमेच्या उत्सवात सुमारे दहा हजार यात्रेकरू तेथे दर्शन घेऊन पंचतरणी येथे परततात.



अमरनाथ बर्फाचे स्वयंभू लिंग

भगवान शंकर श्रावणी पौर्णिमेच्या दिवशी या ठिकाणी पहिल्यांदा प्रकट झाले होते. म्हणून त्या दिवशी येथील दर्शनाचे महत्त्व विशेष पुण्यप्रद मानतात.

भगवान शंकर ज्या वेळी येथे प्रगट झाले, त्या वेळी देवदानव, ऋषिमुनी वगैरे हजारोंनी त्यांचे दर्शन घेतले. शंकरांनी आपल्या माथ्यावरील चंद्रकोर पिळून तिच्यातील अमृत सर्वांना दिले आणि त्यामुळे त्यांनी सर्वांना अमर

केले. तेव्हापासून येथील महादेवाला अमरनाथ हे नाव मिळाले. भगवान शंकर तेव्हापासून या स्थळी बर्फमय लिंगाच्या रूपाने राहू लागले आणि दर्शन घेणाऱ्या भाविकांना ते अमर करू लागले अशी कथा आहे.

अमरनाथाच्या गुहेत एका लहानशा कोनाडचात कबुतरांची एक जोडी राहते. ती शिवपार्वतीची स्वरूपे आहेत, असे सर्व भाविक लोक समजतात. त्या कबुतरांचे दर्शन सर्व लोक मोठचा भक्तिभावाने करतात आणि स्वतःला धन्य समजतात. या दोन्ही कबुतरांचे दर्शन झाल्याशिवाय ही यात्रा पूर्ण झाली असे समजत नाहीत.

या गुहेतील दुसऱ्या एका मोठचा कोनाडचात खडूच्या भुकटीसारखी पांढरी माती आहे. ती प्रसादाची अमर विभूती म्हणून सारे यात्रेकरू लोक घेत असतात. या विभूतीमध्ये कॅल्शियम क्लोराईड व कॅल्शियम सल्फेट हे दोन क्षार असल्याने ही विभूती त्वचारोगहारक आहे.

अमरनाथलिंगाची पूजा करून कोणी सुवर्णाची बिल्वपत्रे, कोणी वस्त्रे, तर कोणी सुका मेवा त्या अमरेश्वरचरणी अर्पण करतात आणि भक्तिभावाने प्रार्थना करून ही यात्रा संपवितात. सारे यात्रेकरू गेल्या मार्गाने परत आपआपल्या स्थळी जातात.

अमरेशसमं लिंगं दिविभूम्यन्तरिक्षगम् ।
महापापहरं देवी न भूतं न भविष्यति ।।

अमरेश्वराचे माहात्म्य सांगणाऱ्या या श्लोकावरून ही अमरनाथाची यात्रा किती श्रेष्ठ व पुण्यप्रद आहे हे समजते. ही यात्रा अत्यंत अवघड मार्गाची असल्यामुळे सर्वांनाच ही

साधेल असे नाही. त्या यात्रेपूर्वी प्रत्येकाने आपल्या प्रकृतिमानाकडे पाहून आधी संपूर्ण विचार केला पाहिजे व या यात्रेला जाण्याचे मार्ग, तेथील हवामान व परिस्थिती ही सर्व आधी नीट समजावून घेतली पाहिजे.

अलीकडे या यात्रेला जाणाऱ्या सर्व यात्रेकरूंची उत्तम सोय सरकारने केली आहे. अवघड रस्ते व्यवस्थित केले आहेत आणि ठिकठिकाणी मुक्कामांची व्यवस्थाही उत्तम केली आहे. श्रावणी पौर्णिमेच्या अमरनाथ यात्रेसाठी भारताच्या सर्व भागांतून हजारो लोक जातात. त्यांचे जीवन पावन होते.

पवित्र स्थानांना मांगल्य प्राप्त होते ते त्या स्थानांच्या अपूर्व इतिहासाने. तसेच त्या पवित्र स्थळांना भेट देणाऱ्या महाभागांच्या उपस्थितीने. तसेच अमरनाथ या स्वयंभू शिवस्थानाचे आहे ! अनेक ऋषी, मुनी, योगी, तपस्वी या अमरनाथाच्या दर्शनाने पुनीत झाले. पौराणिक व ऐतिहासिक कालापासून यासंबंधी दाखले मिळतात. स्वामी विवेकानंदांनी आपल्या संन्यस्त अवस्थेत या पवित्र स्थळाला भेट दिली, ती हकीकत रोमांचकारी आहे. स्वामीजी त्या स्थळी पोचताच एका भावमग्न अवस्थेत वावरू लागले. त्यांनी स्नान केले. भस्मविलेपन करून गुहेतील स्वयंभू शिवलिंगाचे दर्शन घेतले. " चिदानंदरूपम् शिवोऽहं, शिवोऽहं " हा मंत्र सतत मुखातून उच्चारला जात होता. त्यांनी भगवान रामकृष्णांचे स्मरण केले. त्यांना भावावस्था प्राप्त झाली व त्यांना प्रत्यक्ष शंकराचे साक्षात् दर्शन झाले. त्यांच्या मुखमंडलावर विलक्षण तेज विलसू लागले. प्रसन्न

चेहऱ्याभोवती एक तेजोवलय आहे, असे भासू लागले. आनंदसागरात ब्रह्मानंद मिळवण्याचा तो सुवर्णक्षण. त्यांच्या प्रिय शिष्या भगिनी निवेदिता (मार्गारेट नोबल) त्यांच्या समवेत होत्या. त्यांनीही प्रदक्षिणा घातल्या. स्वामीजींच्या तोंडून या साक्षात घडलेल्या भगवान शंकराच्या दर्शनाचे वर्णन ऐकताच त्या मोहरून गेल्या. त्या भावनोत्कटतेने म्हणाल्या, " स्वामीजी, तुम्हांला दर्शन घडले. मीही तुमच्या बरोबर यात्रेस आले आहे. मला दर्शन घडवा. ते घडवून दिल्याशिवाय मी येथून हलणार नाही ! " स्वामीजी क्षणभर शांत झाले. मग हसून म्हणाले, " निवेदिते, मला दर्शन घडले ते गुरुकृपेने. मी एवढा भाग्यवान खरा, पण तुला दर्शन घडविण्याइतके सामर्थ्य माझ्या अंगी नाही. ते सामर्थ्य व ते दर्शन केवळ सदगुरू भगवान रामकृष्ण परमहंसच घडवून आणवू शकतील ! मी असमर्थ आहे. तुझी वेळ येईल त्या वेळी ते घडेल ! "

सवड सापडेल त्या वेळी स्वामी रामतीर्थ हिमालयातील पवित्र स्थळांचे दर्शन घेत. अमरनाथाच्या दर्शनास ते वारंवार जात. ते त्यांचे एक आवडते ठिकाण होते.

काश्मीरच्या महाराजांचे हे कुलदैवत. महाराज दरसाल श्रावण पौर्णिमेच्या वेळी लवाजम्यानिशी चालत या अमरनाथाचे दर्शनास जात असत. महान तपस्वी, संत, महंत, राजकारणी महापुरुष, कोणीही असो, अमरनाथाच्या दर्शनाने प्रसन्न होऊन जातो. धन्य ते अमरनाथदर्शन.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ७१३५७ ........ दि: २५-१९१५
क्रमांक ..३८९........ नों दि: १५/५/५८

# २ : अमृतसर

गुरू नानक यांनी इ. स. १५०० च्या सुमारास शीख धर्माची स्थापना केली. त्यांना पंजाबात अनेक शिष्य मिळाले. ह्या सर्व शिष्यांचा त्यांनी एक पंथच काढला. त्या नवीन पंथाला त्यांनी 'शीख' असे नाव दिले. गुरू नानकांच्या पश्चात् गुरू अंगद हे शिखांचे दुसरे गुरू बनले. आपल्या शिष्यांपुढे त्यांनी वैयक्तिक ध्येयापेक्षा सार्वजनिक ध्येय ठेवले. आपल्या बारा वर्षांच्या कारकीर्दीत त्यांची शिष्यसंख्या खूपच वाढली. गुरू अंगदांना अमरदास हा सर्वोत्तम शिष्य वाटून त्यालाच त्यांनी भावी गुरू बनविले. ह्या सुमारास हुमायून हा दिल्लीला मुसलमान बादशाह होता. शीख धर्माविषयी मुसलमानी बादशाह, सरदार आणि अंमलदार यांत औत्सुक्य निर्माण झाले. आपल्यानंतर आपला जावई गुरू रामदास ह्यास गुरू अमरदासांनी गुरुपद दिले. (इ. स. सुमारे १५७४)

गुरुपदावर नव्यानेच बसलेल्या गुरू रामदासांच्या दर्शनास लोकांच्या झुंडीच्या झुंडी लोटल्या. अनेक भक्तगणांमार्फत गुरू रामदासांची कीर्ती दिल्लीच्या तख्तावर

बादशाह असलेल्या मोगल सम्राट अकबराकडे पोहोचली. भूतदया आणि दातृत्व हे गुरू रामदासांच्या अंगचे विशेष गुण अकबराच्या नजरेत भरले. ह्या सद्‌गुणांमुळे बादशाहाची गुरूवरील भक्ती अधिकच दृढ झाली. त्याला गुरुदर्शनाची तीव्र इच्छा झाली; आणि एक दिवस तो खरोखरच गुरू रामदासांना भेटण्यास आला. त्याने गुरु रामदासांना सर्वतोपरी मदत करण्याची आपली मनीषा सांगितली. अकबराने पूर्वीच गुरू रामदासांच्या नावे लाहोरपासून पूर्वेकडे पन्नास मैल अंतरावर सुमारे पाचशे बिघे जमीन दिली होती. त्याच जागेत गुरू रामदासांनी एक विस्तीर्ण तळे बांधावयास सांगितले. त्या रम्य तळ्याच्या काठी गुरूंनी स्वतःकरिता एक पर्णकुटी आणि जवळच मंदिर बांधून भोवताली एक लहानशी वसाहत केली. त्या वसाहतीला ‘ रामदासपूर ’ असे नाव देण्यात आले. यासंबंधी आणखी एक कथा आहे ती अशी:

ही जागा निश्चित केली त्या पहिल्या तलावापासून काही अंतरावर पाण्याचे डबके होते. त्यात कावळे बुडी मारून बाहेर येत, तेव्हा ते पांढरे शुभ्र झालेले पाहून एका दुःखी रक्तपितीच्या रोग्याने सरकत सरकत जाऊन त्या डबक्यात अंग टाकले. बाहेर आला तो सोन्यासारखा शुद्ध तेजस्वी देह घेऊन ! हे आश्चर्य पाहून क्षणार्धात तेथे हजारो लोक जमले. गुरू रामदासांनी हे प्रत्यक्ष पाहिले व या गूढ शक्तीचे रहस्य शोधून काढण्यासाठी त्यांनी समाधी लावून ध्यान केले. तेव्हा त्यांना कळून आले की रामायणकाळी जो युद्धप्रसंग निर्माण झाला त्या वेळी

लवकुशांनी इंद्रलोकी जाऊन अमृत आणले. ते एका बंद तोंडाच्या भांड्यातून आणीत असता त्यातील काही थेंब खाली पृथ्वीवर गळाले, ते या तलावात पडले. यामुळे या स्थानाचे महत्त्व ओळखून तलावाची योजना पूर्ण करण्याची कामगिरी श्रीगुरू रामदासजी यांनीच केली.

थोड्याच अवधीत रामदासपूराला तीर्थक्षेत्राचे माहात्म्य आले. काही दिवसांनी ते तळे सुंदर रीतीने बांधून काढण्यात आले. त्यातील स्फटिकसदृश स्वच्छ दिसणारे पाणी शिखांना अमृतासमान वाटू लागले. त्या आधीचे शिखांचे 'गुरू अमरदास' यांच्या पश्चात् त्यांचे स्मारक म्हणून तलावाचे नाव 'अमरसर' वा 'अमृतसर' असे ठेवण्यात आले. सर्व वसाहतीला असलेले पूर्वीचे 'रामदासपूर' हे नाव बदलून आता 'अमृतसर' असेच नाव पडले. हल्लीचे पूर्व पंजाबातील शिखांचे सुप्रसिद्ध पवित्र क्षेत्र अमृतसर ते हेच. नंतर याच ठिकाणी एक भव्य मंदिर उभारण्यात आले, त्या मंदिरास 'गुरुद्वार' म्हणतात.


रामदासपूर अमृतसर बनले. ह्या पवित्र अमृतसर-मधील शीख वसाहतीचा पुढील गुरूंना शीखधर्मप्रसाराला खूपच फायदा झाला. ह्याच्या परिसरातील बरेच शेतकरी-कामकरी शीख धर्मपंथात सामील झाले. ह्या लोकांची गुरूंवर देवांप्रमाणे अढळ श्रद्धा असे. हेच लोक त्या वेळच्या शीख सैन्याचे प्रमुख असत. हल्लीच्या हिंदी सैन्यातही शिखांची संख्या प्रचंड आहे. अमृतसर हे ठिकाण वायव्य सरहद्द प्रांत आणि पंजाब यांच्या सांध्यावरील नाके असल्याने ते लवकरच दळणवळणाचे केंद्र बनले आणि व्यापारी

दृष्टीने त्याचे महत्त्व वाढले. बुखारा, काबूल, काश्मीर वगैरे ठिकाणांहून हिंदुस्थानात येणाऱ्या मालावरील जकात घेण्याचे नाके अमृतसरच बनले; याच जकातीच्या उत्पन्नावर पुढे महाराजा रणजितसिंगाने शीखराज्याची सांपत्तिक स्थिती सुधारली; आणि त्याला मानाचा दर्जा मिळवून दिला.

गुरू रामदासांनी वसविलेल्या ' रामदासपूर ' व तेथील पवित्र ' अमृतसर ' सरोवर ह्या स्थलांना चौथे गुरू अर्जुन यांनी अधिकच महत्त्व आणले. हिंदूंना परम पवित्र काशी, मुसलमानांना जशी मक्का, त्याचप्रमाणे शीखांकरिताही एक पवित्र असे क्षेत्र असले पाहिजे, असा विचार गुरू अर्जुनांचे मनात चमकून गेला. ताबडतोब त्यांनी ह्या क्षेत्राकरिता अमृतसर ह्या पवित्र नगराची योजना केली. गुरू रामदासांपासून त्या सरोवरास पावित्र्य प्राप्त झाले होते. शीखांची अशी भावना होती की, त्या ठिकाणी मृताची रक्षा टाकली असता मृताला सद्‌गती मिळते. त्या सरोवराचे पावित्र्य आणि निसर्गशोभा वृद्धिंगत करण्यासाठी गुरू अर्जुनांनी त्या ठिकाणी ' हरमंदिर ' अथवा हल्लीचे प्रसिद्ध ' सुवर्णमंदिर ' बांधले. अनेक कुशल कुशल स्थापत्य विशारदांनी ह्या सुंदर आणि पवित्र मंदिराची उभारणी केली. अमृतसरसारखी निसर्गशोभा आणि तेथील सुंदर असे सुवर्णमंदिरासारखे देवस्थान ह्यांच्या संयोगावर गुरू अर्जुनांनी आपला मठही येथेच स्थापन केला. ते स्वतः तेथे येऊन राहिले.

अमृतसर या नगरात निसर्ग, परमेश्वर आणि भक्त

यांचा हा असा त्रिवेणीसंगम झाला. नंतर हे स्थान, हे पवित्र क्षेत्र शीखधर्मकार्याचे मुख्य केंद्र बनले. ह्या शीख-धर्माच्या केंद्राभोवती आणि बारीदुआब ह्या भागात कष्ट



सुवर्णमंदिराचे प्रवेशद्वार अमृतसर

करून राहणाऱ्या प्रामाणिक शेतकऱ्यांत गुरू अर्जुनांनी आपल्या कार्याचा आणि तत्त्वज्ञानाचा प्रचार केला; आणि त्यांना आपल्याकडे ओढले. गुरू अर्जुनसिंह यांनी ह्या सुवर्णमंदिरात आदिग्रंथाची स्थापना केली. ह्या आदि-ग्रंथासच ‘ ग्रंथसाहेब ’ असे म्हणतात.

गुरू अर्जुनसिंहानंतर शीखधर्माबद्दल मुसलमानात द्वेष निर्माण झाला. अनेकांचा त्यांना प्रत्यक्ष रीत्या विरोध होऊ

लागल्याने ह्यापुढचे पाचही गुरू तरवारबहाद्दर होऊन गेले. गुरू हरगोविंद, गुरू हरराय, गुरू हरकिसन, गुरू तेघबहादूर आणि गुरू गोविंदसिंह ह्या पाचही गुरूंनी दिल्लीच्या बादशहाच्या जुलुमास दाद न देता आपले शीखसैन्य उभारले आणि शीखांची शीखधर्मसंरक्षक फळी निर्माण केली. शिखांचे शेवटचे गुरू गोविंदसिंह यांनी शीखधर्माची सामाजिक दृष्टीने पुनर्रचना केली. त्यांनी यापुढे गुरू नेमण्याची पद्धती बंद केली; आणि 'ग्रंथसाहेब' हा शिखांचा आदिग्रंथच त्यांचा गुरू बनला. ग्रंथसाहेब या ग्रंथात बहुतकरून सर्व शीख गुरूंनी रचलेली स्तोत्रे आहेत. त्यांतील काही पदे नामदेवासारख्या हिंदू संतांची आणि काही तर मुसलमान संतांचीसुद्धा आहेत. सर्वधर्मीय गुरूंची शिकवण यात जणू एकत्र झालेली आहे. ही स्तोत्रे गाण्याच्या निरनिराळ्या रागात म्हटली जातात. शिखांची लग्ने ग्रंथसाहेबाच्या साक्षीने होतात. वधूवर ग्रंथसाहेबाभोवती तीन प्रदक्षिणा घालतात. उपाध्याय त्यांच्याकडून ग्रंथातील वचने म्हणून घेतात. वधुवरांना आशीर्वादपर भाषणे करतात. शुभेच्छा व्यक्तवितात, प्रसाद वाटतात.

गुरू आणि शिष्य, उच्च आणि नीच हा समज नष्ट करून सर्व शीख व्यक्तिशः समान पातळीवर आणण्यासाठी गुरू गोविंदसिंहांनी अतिशय प्रयत्न केला. शीखधर्माची दीक्षा देण्याची एक विशिष्ट प्रथा पाडून दिली. दीक्षा घेतलेल्या शिखांसाठी गोविंदसिंहांनी बारा प्रमुख तत्त्वे आणि आज्ञा सांगितल्या आहेत. ह्यांपैकी एक अशी आहे की, 'अमृतसर' नगर तीर्थक्षेत्र समजून तेथे प्रत्येक

शिखाने जाऊन स्नान करावे आणि गुरुद्वाराला देणगी द्यावी. अशा प्रकारे शिखांच्या नित्याच्या आचारधर्मात 'अमृतसर'चे महत्त्व वाढले.

अमृतसर हे शिखांचे केंद्र असल्याने ते नष्ट करण्याचे अनेक प्रयत्न झाले. अहमदशाह दुराणी याने इ. स. १७६१ मध्ये अमृतसरवर हल्ला केला होता आणि सर्व शहराचा विध्वंस केला होता. त्याने देवळावरही हल्ला केला होता. त्यानंतर इ. स. १७६४ मध्ये हे शहर संपूर्ण नव्याने वसविले गेले. इ. स. १८०२ मध्ये महाराणा रणजितसिंह याने 'हरिमंदिर' व 'सुवर्णमंदिर' या पवित्र देवळांची सर्व शिखरे सोन्याच्या पत्र्यांनी मढविली. त्याने याच ठिकाणी गोविंदगढ हा किल्लाही बांधला.

अमृतसर शहराला बारा वेशी आहेत. पूर्वी जसे पेशावर, तसे आता पाकिस्तानच्या निर्मितीनंतर अमृतसर हे सरहद्दीवरचे शहर आहे. अमृतसर हे रेल्वे-स्टेशन असल्याने अमृतसर शहरात रेल्वेने जाता येते. शहरात हिंडावयाचे असल्यास नगरपालिकेच्या बसेस उपलब्ध आहेत. तसेच टांगे, टॅक्सीज् आदी वाहनांची सोयही आहे. इथून दोन-तीन तासांच्या अंतरावरच पाकिस्तानचे लाहोर हे प्रमुख शहर आहे. अमृतसर हे आता भारतातील मोठ्या शहरात गणले जाते. सुंदर सुंदर इमारती, स्वच्छ लांब-रुंद रस्ते; आणि विशेष म्हणजे येथील सुवर्ण-मंदिर ! अमृतसरोवर आणि सुवर्णमंदिर यांमुळे या शहराची शोभा शतगुणित झाली आहे. ते पाहण्याकरिता केवळ भारताच्याच कानाकोपऱ्यातून नव्हे तर अखिल


जगतातून कित्येक लोक मुद्दाम येतात आणि या पवित्र स्थानाचे दर्शन घेऊन पावन होतात.

स्टेशन आणि सुवर्णमंदिर यांच्यामध्ये कैसर बाग आहे. देवळाच्या प्रवेशद्वाराजवळ घड्याळाचा मनोरा आहे. या मनोऱ्याच्या पूर्वेकडे जाणाऱ्या रस्त्यावर जालियनवाला बाग आहे. इंग्रजांनी केलेल्या काळ्या कायद्याचा निषेध करण्यासाठी येथे १९१९ साली जंगी सभा भरली होती. तेव्हा जनरल डायर या इंग्रज अधिकाऱ्याने तोफा डागून अनेक निरपराधी माणसे निष्कारण ठार मारली. त्याच्या खुणा अजूनही भिंतींवर दिसतात. पाहणाऱ्या प्रत्येक हिंदी माणसाच्या मनात चीड उत्पन्न होते; येथे बांधलेल्या हुतात्म्याच्या स्मारकासमोर लोक क्षणभर उभे राहतात. आशा वेळी त्यांना वंदन करण्याकरिता मस्तक नकळत खाली झुकते. ही जालियनवाला बागेतील प्रतीके म्हणजे ब्रिटिश पाशवी सत्तेच्या अमानुष कृत्यांची जिवंत निशाणीच !

अमृतसर हे प्रसिद्ध तळे शहराच्या अगदी गाभ्यात आहे. त्याची लांबी आणि रुंदी सुमारे १४० मीटर आहे. अशा या चौरसाकृती तळ्याला फरसबंदी पायऱ्या केल्या आहेत. या तळ्याच्या मध्यभागी गुरुद्वार आहे. तळ्याच्या पश्चिमेकडील अंगास एक लहानसा ६० मीटर्स लांबीचा पूल आहे. या पुलावरून सुवर्णमंदिराकडे जाता येते. हा पूल फरसबंदी असून दोन्ही बाजूंना सोन्याचा मुलामा दिलेले चमचमणारे दिवे आहेत.

अमृतसरमधील सुवर्णमंदिर हे एक थोर आश्चर्यकारक

मंदिर शिखांचे परम पवित्र ठिकाण आहे. या देवालयात जितके सोने वापरले आहे; तितके सोने दुसऱ्या कुठल्याच



जालियनवाला बाग स्मारक, अमृतसर

देवळात वापरलेले नसेल. या मंदिराच्या आणि तळ्याच्या भोवती ज्या अनेक इमारती आहेत त्या 'बंगा' या

नावाने ओळखल्या जातात. तळ्याच्या वायव्येस अकाल-साहेबांचे तख्त आहे. याचा घुमट सोन्याने मढविला आहे. पूर्वेला दोन स्तंभ आहेत. ते ‘ रामगढी मिनार ’ म्हणून ओळखले जातात.

या सुवर्णमंदिराच्या आवारात प्रवेश करण्यापूर्वी मुख्य प्रवेशद्वाराजवळच जोडे, बूट, कॅमेरा, सिगारेट, काड्याची पेटी वगैरे सर्व वस्तू तिथे असलेल्या माणसाजवळ काढून ठेवायच्या असतात. ते संभाळण्यासाठी स्वयंसेवक असतात आणि ते हे काम आनंदाने व स्वेच्छेने पत्करतात. हिंदूंच्या देवळासमोर तुळशीफुले विकायला बसतात, त्याप्रमाणे या प्रवेशद्वारापाशीही फुले आणि फुलांच्या माळा विकणारे अनेक फूलविके बसलेले असतात. आतल्या लांबरुंद विस्तीर्ण आवारात पांढऱ्या दगडांची फरसबंदी केलेली आहे आणि मध्यभागी पाण्याची खूप मोठी पुष्करिणी आहे. सुवर्ण-मंदिराचा सोन्याच्या पत्र्याने मढविलेला घुमट सूर्य-प्रकाशाने झगमगता दिसतो; त्यामुळे डोळे दिपून जातात. सुवर्णमंदिर फारसे प्रशस्त नाही. मध्यभागी रेशमी आणि जरतारी वस्त्रांनी आच्छादिलेला ग्रंथसाहेब आहे. त्यावर फुलामाळांचा ढीग पडलेला असतो. त्यापुढे गुडघे टेकून नमस्कार करतात. सर्व मंदिरांमध्ये उघड्या डोक्याने वावरण्यास बंदी आहे. डोक्यावर काही तरी आच्छादन निदान रुमाल तरी पाहिजे. भक्त ग्रंथसाहेबापुढे भाव-भक्तीने सोने, नाणे, नोटा, दागिने, अंगठ्या, रत्ने, जड-जवाहीर, मोती इत्यादी अनेक गोष्टी समर्पण करतात. बाजूला बहुधा ग्रंथ साहेबातील उताऱ्यांचे वाचन व शिखांचे

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ४१३५३ दि: २५-१०७१
क्रमांक ३८६ नोंद दि: २५/३/८०



भजन चालू असते. सभोवतालच्या लहानशा जागेत भक्तगण उभे असतात; आणि भजन संपताच ग्रंथसाहेबावर



'ग्रंथसाहेब' या धर्मग्रंथाचे वाचन

पांढऱ्यापिवळ्या फुलांच्या माळा ठेवतात. प्रसाद म्हणून त्यातील काही फुले परत मिळतात. ग्रंथसाहेबाच्या भोवती लाल मिन्याची पानेफुले काढलेल्या आणि गाभाऱ्याच्या

भिंती सोन्याच्या पत्र्यांनी मढविलेल्या आहेत. बाहेर ताजमहालप्रमाणे पांढऱ्या संगमरवराच्या जाळीदार भिंतींवर रंगीबेरंगी दगडांच्या वेलबुट्टचा आहेत.

तिथेच आतल्या बाजूला वर जायचा पांढऱ्या संगमरवराचा जिना आहे. पहिल्या मजल्यावर आणि त्याचप्रमाणे दुसऱ्या मजल्यावरही एक शीख हात दोन हात लांब-रुंद भला मोठा ग्रंथसाहेब पुढचात ठेवून, आपल्याकडे पोथीवाचन करतात त्याप्रमाणे, तालासुरांत त्याचे पठण करीत असतो.

अशा या तीर्थक्षेत्री हिंडताना काही ठिकाणी पडझड झालेली दिसेल; काही सुंदर देवळे भग्न झालेली दिसतील! काही गल्ल्यांत पडकी, कोसळलेली व अर्धी जळकी घरे दिसतील; हा पाकिस्तान्यांच्या पाशवी विमानहल्ल्याचाच परिणाम बरं! येवढचा पवित्र आणि सुंदर शहराची शोभा पाकिस्तानमधील नापाक लोकांना पाहवली नाही; आणि त्यांनी सप्टेंबर १९६५ मधील भारतावरच्या हल्ल्यात या शिखांच्या तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी अमानुष असा बॉम्बहल्ला केला; आणि शिखांच्या पवित्र भावनांना जबर धक्का पोहोचला. शहरात पुष्कळच हानी झाली. पण सुवर्णमंदिराला काही झाले नाही!

असो! पूर्वीचे जालियनवाला बागेतील अत्याचाराच्या खुणा आणि आताच्या पाकिस्तानने केलेल्या जखमांचे वण अंगावर घेऊन हे शिखांचे पवित्र तीर्थक्षेत्र अमृतसर पुन्हा हालत आहे, चालत आहे, खेळत आहे, खिदळत आहे!

# ३ : अमरकंटक

विंध्याद्रीचा पूर्वेकडील फाटा मेकल पर्वत या नावाने ओळखला जातो. या पर्वताची उंची सुमारे अकराशे मीटर आहे. या पर्वताच्या एका भागाला अमरकंटक म्हणतात.

मध्यप्रदेशातील बिलासपूर ते कटनी रेल्वेच्या मार्गावरील पेंडरा स्थानकावर उतरून सुमारे बारा किलोमीटर अंतरावर अमरकंटकला जाता येते.

अमरकंटकच्या पठारावर नर्मदा, शोण व महानदी या नद्यांची उगमस्थानें आहेत. तीन नद्यांच्या संगमस्थानापेक्षाही तीन नद्यांच्या उगमस्थानाला मोठा मान असतो. म्हणूनच अमरकंटक हे अत्यंत महान असे पवित्र तीर्थक्षेत्र मानले जाते.

ग्रहण पुण्यपर्वकाळात अमरकंटकाची यात्रा केली तर अश्वमेध यज्ञाच्या पुण्यापेक्षाही दसपट पुण्य मिळते. अमरकंटकाची प्रदक्षिणाही महान पुण्यप्रद मानली जाते.

अमरकंटक पर्वतावर अमरनाथ महादेवाचे स्थान आणि नर्मदा देवीचे मंदिर ही अत्यंत पवित्र स्थळे आहेत. याखेरीज तेथे अनेक मठ, मंदिरे आणि आश्रम बांधलेले

आहेत. त्या प्रत्येकाचे महत्त्व आणि इतिहास प्राचीन काळापासून प्रसिद्ध आहे.


नर्मदा नदीच्या उगमस्थानी जलेश्वर नावाचे एक पावन कुंड आहे. ते येथील मुख्य पवित्र स्थान मानतात. या कुंडाजवळच कर्णमंदिर नावाचे एक अत्यंत जुने मंदिर आहे. कर्ण नावाच्या राजाने हे मंदिर बांधले होते. ते आता जीर्णावस्थेत असले तरी त्याचे अप्रतिम कलाकौशल्य अद्यापही तज्ज्ञांना थक्क करते. हे मंदिर बांधण्यात त्या राजाने आपली सारी हयात खर्चिली. तरीही या मंदिराचे कलापूर्ण बांधकाम पूर्ण झाले नाही. कॅनिंगहॅम नावाच्या संशोधकाने हे मंदिर पाहिले तेव्हा त्याने मध्यप्रदेशातील खजुराहो नावाच्या प्रख्यात मंदिरापेक्षाही याची खूपच वाखाणणी केली होती.

अमरकंटकाला अमरकूट असेही नाव आहे. कारण या पर्वतावर पूर्वी आंब्याची खूपच झाडे होती. अद्यापही तेथे अनेक प्रकारची झाडे, वेली आणि फुले यांनी सर्व भाग अत्यंत शोभिवंत झालेला असतो. या ठिकाणची वनश्री अत्यंत रम्य असते. स्वर्गतुल्य रमणीय अशा या अमर कंटकावर अनेक देव, गंधर्व आणि ऋषिमुनी राहतात. ब्रह्मा-विष्णू, उमामहेश, इंद्र आणि विद्याधर वगैरे देवतांचा येथे नित्य वास असतो.

महाकवी कालिदास यांनी आपल्या मेघदूत नावाच्या काव्यात अमरकंटकाचा उल्लेख आम्रकूट या नावाने केला आहे. रामगिरी पर्वतावरून निघून अमरकूटावर विश्रांती घेण्यास मेघदूताला सांगितले. कारण ते पवित्र आणि रम्य

स्थळ विश्रांतीसाठी अत्यंत योग्य असे ठिकाण आहे.

अमर म्हणजे देव आणि कट म्हणजे शरीर म्हणून देवाच्या शरीरांनी व्याप्त असा हा पर्वत आहे. अमरकट-अमरकूट-अमरकंटक हे स्थान अति पुण्यप्रद आणि तपस्व्यांना सिद्धी प्राप्त करून देणारे महान क्षेत्र आहे. देवांना तसेच मानवांनाही हे क्षेत्रस्थान फारच प्रिय आहे.



अमरकंटक

अमरकंटकाच्या रिक्षपाद भागावर भगवान श्रीशंकर तपाचरण करीत बसले होते तेव्हा त्यांच्या अंगाला घाम आला. त्या घामाच्या धारांचा एक प्रवाह बनला. तो पाहून शंकर म्हणले, "ही एक अमृतवाहिनी नदीच आहे ! ही नदी भारतामधील सर्व नद्यांत अत्यंत पवित्र मानली जाईल ! "

भगवान शंकरांचा असावर मिळताच त्या नदीला विलक्षण तेज प्राप्त झाले. त्या महापवित्र तीर्थप्रवाहात स्नान करून पुण्य संपादनासाठी सर्व देव धावत आले. पण चमत्कार असा झाला की, ती नदी एकदम गुप्त झाली. पुनः थोड्या अंतरावर ती प्रगट झाली. नंतर पुनः गुप्त, पुनः प्रगट असा प्रकार तिने केला. त्यामुळे तिच्या काठा-काठाने सर्व देव-मानव धावत सुटले. त्यांना ती नदी पाहून अतिशय आनंद झाला. ते म्हणाले, "ही नदी नर्मदा आहे !"

अमरकंटकाच्या मेकल पर्वतातून ही नर्मदा नदी उगम पावली म्हणून तिला मेकलकन्यका हेही नाव मिळाले. गिरिशिखरावरील एका कुंडातून नर्मदेची अगदी लहान धार बाहेर येते. पुढे दोन मैल वाहून सत्तर फुटांवरून खाली पडते. या स्थानाला कपिलधारा म्हणतात. विंध्य आणि सातपुडा या पर्वतश्रेणींच्या मध्यभागी मेकल पर्वतश्रेणींच्या मध्यभागी मेकल पर्वत उभा आहे. भारतमातेच्या कटी-वरील ही नदी जणू तिची मेखलाच आहे, ही नदी भारत-मातेचा एक बहुमोल अलंकारच आहे !

रिक्षपाद पर्वत हा अमरकंटकाचाच भाग आहे. त्यातील मेकल भागात उगम पावलेल्या या नदीला विंध्य पर्वतातून उगम पावून आलेली रेवा नावाची नदी मिळते. त्या दोन्ही प्रवाहांचा संगम ज्या स्थळी झाला आहे त्या स्थळाला मंडल असे नाव आहे. त्या ठिकाणी नर्मदेलाच रेवा म्हणतात. अत्यंत खडकाळ प्रदेशातून धावत उड्या घेत जाणारी ही रेवा म्हणजेच नर्मदा होय !

अशा प्रकारे भगवान शंकरापासून या नदीची उत्पत्ती झाल्यामुळे तिला रुद्रकन्या, अमृता, नर्मदा, मेकलकन्यका, रेवा वगैरे अनेक नावे मिळाली आहेत आणि तिला विशेष पावित्र्य प्राप्त झाले !

जलेश्वर कुंडापासून नर्मदेचा प्रवाह पश्चिमेकडे तीन किलोमीटर वाहत गेल्यावर एका उंच कडयावरून उडी घेतो. त्या ठिकाणाला कपिलधारा असे म्हणतात. हे स्थान स्नानासाठी अत्यंत पावन आहे. तेथून जवळच मंडल हे पवित्र स्थान आहे. त्यानंतर जबलपूरजवळ 'ध्रुवतारा' नावाचा धबधबा आहे! त्यानंतर संगमरवरी खडकातून नर्मदेचा प्रवाह वाहत जातो तो स्फटिकशुद्ध जलप्रवाह अगदी प्रेक्षणीय आहे.

विंध्य आणि सातपुडा या दोन पर्वतांमधील नर्मदा प्रवाहाचा परिसर नैसर्गिक सौंदर्याने अतिशय संपन्न असाच आहे. उगमापासून सुमारे तेराशे किलोमीटर लांब वाहत जाणारी ही पश्चिमवाहिनी नर्मदा, कधी रुंद तर कधी अरुंद पात्र धारण करीत शेवटी पश्चिम समुद्राला भृगुकच्छ (भडोच) या प्रसिद्ध गावाजवळ मिळते. हा तिचा सागरसंगम दर्शनीय तसाच महान् पावन आहे !

नर्मदा नदी पापविनाशिनी आहे. गंगा, यमुना, सरस्वती या नद्यांपेक्षाही नर्मदा सदासर्वदा सर्व ठिकाणी पवित्र मानली जाते. नर्मदेच्या नुसत्या दर्शनानेही माणूस पवित्र बनतो. नर्मदेत स्नान करून उपवास केला तर त्या माणसाच्या शंभर पूर्वजांना मुक्ती मिळते. नर्मदेला त्रिवार नमस्कार जो करील त्याला सर्पाच्या विषाची बाधा

होणार नाही असे सांगितले जाते.

सूर्यग्रहण किंवा चंद्रग्रहण अशा पर्वकाळात अमरकंटकाची यात्रा केल्यानें अश्वमेघ केल्यापेक्षा दहापट पुण्य मिळते. असे पद्मपुराणात सांगितले आहे.

जगन्नाथपुरीच्या यात्रेला जाताना अगर तेथून परत येताना, अमरकंटकाची यात्रा करण्याचा प्रघात आहे.

मत्स्य पुराणात, अमरकंटक क्षेत्राचे वर्णन असे केले आहे :

**अग्नौ विषे जले वापि तथा चैव ह्युपोषणे ।**
**पतनं कुरुते यस्तु अमरेशे नराधिप ॥**
**अनिर्वर्तिगतिर्यस्य पवनस्याम्बरे यथा ।**
**एवं भोगो भवेत्तस्य यो मृतोऽमरकण्टके ॥**

[जो कोणी अग्नी, विष, जल किंवा उपोषण या साधनांनी या शिखरावर देह ठेवतो, त्याला (स्वर्गांत) विविध भोग मिळतात आणि येथे देहपात करतो, त्याला आकाशातील वायूच्या न परतणाऱ्या गतीप्रमाणे मोक्ष मिळतो. ]

नर्मदेच्या काठी सुमारे चारशे तीर्थे आहेत. त्या सर्व तीर्थांत जलेश्वरकुंड हे सर्वश्रेष्ठ तीर्थकुंड आहे. तेथे श्राद्धविधी केला तर पितरांना मुक्ती मिळते. या नर्मदेच्या पात्रात एखादे झाड जरी पडले तरी ते पावन होते. अमरकंटकावर मृत्यू येणे ही मोठीच पुण्याई समजतात.

बाणासुर या नावाचा एक बलाढ्य दैत्य होता. तो शिवभक्त होता. पण त्याच्या छळामुळे सारी पृथ्वी ऋषिमुनी आणि देवगंधर्व त्रासून गेले. त्यांनी बाणाचा नाश करण्यासाठी भगवान शंकरांची प्रार्थना केली. स्वतःच्या भक्ताचा नाश करणे बरे वाटेना. पण देवांचे

मानवाचे आणि पृथ्वीचे रक्षण करणे त्या महादेवाला प्राप्तच होते.

भगवान शंकरांनी बाण दैत्यावर स्वारी केली. त्याचा पहिला पराभव अमरकंटक येथे झाला. पुनः दुसरा पराभव नर्मदातटाकी झाला. आता तिसऱ्या वेळी बाणाचा संपूर्ण नाश होणार, त्या वेळी बाण शंकराला शरण गेला. तो म्हणाला, "देवा, माझा नाश करा, पण माझ्या जवळचे हे शिवलिंग सुरक्षित ठेवा ! " त्याची ती भक्ती पाहून भगवान शंकर प्रसन्न झाले. त्यांनीबाणाला अमरत्वाचा वर दिला. बाण पुनः अजिंक्य झाला.

बाणाचे ते शिवलिंग नर्मदा नदीच्या पात्रात राखले गेले आणि तेव्हापासून नर्मदेतील सारे गोटे शिवलिंग बनले. भाविक लोक नर्मदेतील ती बाणलिंगे आणून त्यांची भक्तिभावाने पूजा करतात.

अमरकंटकावर नर्मदेला अशा प्रकारे विशेष महत्त्व प्राप्त झाले. तिच्या उगमस्थानाजवळील जलेश्वर कुंड, नंतर कपिलधारा, मंडल, ध्रुवतारा वगैरे तीर्थांपेक्षाही नर्मदा, कपिला आणि विशल्या या तीन नद्यांच्या संगमस्थानाला मोठे पावित्र्य आहे. नर्मदा नदीला अशी एकंदर पस्तीस ठिकाणी संगमस्थळे आहेत. त्यांपैकी उत्तर किनाऱ्यावर अकरा आणि दक्षिण बाजूला तेवीस संगमस्थळे आहेत. शेवटचे पस्तिसावे सागरसंगमाचे ठिकाण ! ही सर्व स्थाने पुण्यापावन मानली जातात.

रेवासागर संगमाच्या भृगुकच्छ क्षेत्रापासून निघून अनेक लोक दरवर्षी नर्मदेची प्रदक्षिणा करतात. ते पदयात्रा

करीत भृगुकच्छापासून एका तीराने अमरकंटकावर येतात. तेथे तिच्या उगमाला प्रदक्षिणा करून दुसऱ्या तीराने पुनः पदयात्रा करीत थेट नर्मदा सागर संगमावर जातात. अशा प्रकारची नर्मदाप्रदक्षिणा करण्यात महापुण्य मिळते. नर्मदा प्रदक्षिणेचे हे थोर धार्मिक कृत्य आपल्या जीवनभर करणारे अनेक जथे आपणांला अमरकंटकावर भेटतात.

अमरकंटकावर अनेक देवदेवतांचा निवास आहे. ऋषि-मुनींची ती एक महान तेजस्वी तपोभूमी आहे. साधुसंतांचे आणि भक्तभाविकांचे ते एक थोर श्रद्धास्थान आहे. निसर्ग-सौंदर्याचा तो अद्भुत खजिना आहे. अमरकंटक हे विख्यात पुराणप्रसिद्ध पावन तीर्थक्षेत्र आहे.

इतिहासकाळातही अमरकंटकाची प्रसिद्धी विशेषच होती. त्या ठिकाणी पूर्वी गोंड लोकांची वस्ती होती. त्यानंतर हैहय वंशाचे राजे येथे राज्य करीत होते. त्यांची राजधानी रत्नपूर ही नगरी होती. नीलध्वज नावाच्या राजाने मंडल स्थानावर माहिष्मती नावाची राजधानी स्थापून राज्य केले. त्यानंतर हंसध्वज राजाने चंदपूर ही राजधानी केली. नंतरच्या राजाने पुनः रत्नपूर येथे राजधानी नेली.

राजा रघुनाथसिंह याच्याकडून मराठ्यांनी इ. स. १७४५ मध्ये अमरकंटकाचा भाग आणि त्याचे राज्य जिंकून घेतले. होळकरांनी तेथे अंमल बसविला. त्यांनी माहिष्मती हीच आपली राजधानी केली होती. नंतर त्यांनी इंदूर येथून कारभार सुरू केला. इंग्रजी अमलानंतर हा भाग भारताच्या मध्यप्रदेशात गेला आहे.

इ. स. ११५ ते १९४ पर्यंत अमरकंटकाच्या भागात कर्णपाल याचेराज्य होते. त्या काळात त्याने अमरकंटकावर अनेक मंदिरे बांधली होती. नर्मदा नदीचे हे उगमस्थान त्याच्याच कार्यामुळे एक महान प्रसिद्ध तीर्थक्षेत्र म्हणून नावाजले गेले. त्या राजाने नर्मदेच्या तीरावर अनेक शहरेही वसविली होती. नर्मदेचे माहात्म्य त्याने खूपच वाढविले.


विंध्यपर्वत हा भारतमातेचा जणू काय अत्यंत सुंदर असा मौल्यवान कमरपट्टाच आहे. त्यातील हे अमरकंटक तीर्थक्षेत्र म्हणजे जणू एक अमोल रत्नच आहे. नर्मदा ही रुणझुणती मेखला पाहून कोणीही माणूस थक्कच होईल. तिच्या नुसत्या दर्शनानेही कोणी नास्तिक खचितच आस्तिक बनेल. अमरकंटक हे निसर्गसुंदर, पुराणपावन, इतिहास-प्रसिद्ध आणि आधुनिक शास्त्रीय चिकित्साकाळातील एक विलक्षण गूढ असे चमत्कारस्थळ आहे. अमरकंटकावर जाऊन तेथील दैवीसौंदर्य निरीक्षण केले पाहिजे आणि त्या पवित्र नर्मदाजलात स्नान करून शुद्ध झाले पाहिजे !

# ४ : गिरनार

गिरनार हे गुजरातमधील दत्तात्रेयाचे डोंगरमाथ्या-वरील एक पवित्र स्थान आहे. पालिठाण्याचा शत्रुंजय पर्वत उतरल्यावर दुसरा एक डोंगर लागतो तो गिरनारचा डोंगर. या ठिकाणी जाण्यासाठी प्रथम जुनागडला उतरावे लागते. पश्चिम रेल्वेच्या विरमगाव-राजकोट-वेरावळ या फाटयावर राजकोटपासून अंदाजे शंभर मैलांवर जुनागड हे स्टेशन आहे. सोमनाथ या पवित्र मंदिराकडे जाण्याचा हाच मार्ग आहे.

जुनागड हे शहर प्राचीन काळापासून प्रसिद्ध आहे. श्रीकृष्णाची द्वारका निर्माण होण्यापूर्वी आनर्ताचा पुत्र रेवत. याने याच ठिकाणी आपली कुशस्थली नावाची राजधानी वसविली होती. चंद्रगुप्त मौर्याच्या काळात येथे गिरी-नगरची स्थापना झाली आणि कुशस्थळी हे नाव मागे पडले. आता अलीकडे या ठिकाणच्या भागाला जुनागड संस्थान असे म्हणत. संस्थान नबाबाच्या ताब्यात होते. भारत स्वतंत्र झाल्यावर संस्थाने विलीन झाली आणि जुनागड हे भारताचा एक अविभाज्य विभाग झाले.

गुजरातचा सुप्रसिद्ध भगवद्भक्त नरसी मेहता यांचे जुनागड हे वसतिस्थान. " वैष्णव जन तो तेने कहिये " या भक्तिगीताने त्याने सर्व गुर्जर बंधूंना भक्तिमार्गाचे धडे दिले. तो एकतारीवर भक्तिगीते गाऊ लागला की त्याचे देहभान हरपे. तो श्रेष्ठ कृष्णभक्त होता. तो ज्या ठिकाणी राहत असे, त्या ठिकाणी नरसीमेहता-मंदिर बांधण्यात आले आहे.



गिरनार पर्वत, पायथा

जुनागड हे ठिकाण आणखी एका गोष्टीने प्रसिद्धीस आले आहे. गिरनार पर्वताच्या या विभागातील जंगलात सिंहांची आशियातील प्रमुख वस्ती आहे. पाचशे चौरस

मैलांच्या या अरण्यात तीनशे सिंह आहेत. त्यांची शिकार अरण्यास बंदी आहे. घनदाट जंगलाच्या मध्यभागी प्रवासी लोकांसाठी बंगला असून तेथे राहून निसर्गरमणीय परिस्थितीत सिंह, सिंहिणी व बच्चे स्वैरपणे संचार करीत असतात, ते दृश्य येथून दृष्टीस पडते.

जुनागडपासून तीन मैलांवर गिरनारचा डोंगर लागतो. वाटेत सुवर्णरेखा नावाच्या छोटयाशा नदीला बांध घालून एक कुंड बनविले आहे. या कुंडात भाविक लोक पितरांच्या अस्थी विसर्जित करतात. इथल्या पाण्यात टाकलेल्या अस्थी थोडयाच दिवसात विरघळून जातात. वरच्या बाजूस दामोदरमंदिर आहे. तेथूनच पुढे गिरनारला जायचे. वाटेत अशोकाचा शिलालेख आहे तो हत्तीच्या पाठीवर कोरलेला दृष्टीस पडतो. त्यावर अशोकाने आपल्या चौदा धर्माज्ञा कोरल्या आहेत.

गिरनार पर्वत चढून गेल्यावर त्यावर पुढे एक उंच शिखर लागते. त्याचे नाव गोरखनाथशिखर. हे शिखर छत्तीसशे सहासष्ट फूट उंच असून त्यावर जाण्यासाठी एकंदर दहा हजार पायऱ्या आहेत. तगडया माणसालाच या पायऱ्या चढून जाता येते. इतरांना डोल्या कराव्या लागतात. माणसाच्या वजनावर डोलीचा दर ठरविला जातो. माणशी साधारणपणे चाळीस ते पन्नास रुपये डोलीला खर्च येतो. पायी जाणारे लोक हातात काठी घेऊन जातात आणि पायी जाऊन दर्शन घेण्यात धन्यता मानतात. ज्यांना पायी जाता येणे शक्य होत नाही त्यांना डोल्या करूनच जाणे भाग पडते.

गिरनारवर जाण्यासाठी दगडी पायऱ्या बांधलेल्या आहेत, वाहड नावाच्या एका प्रधानाच्या मुलाने या डोंगर शिखरावर जाण्यासाठी या पायऱ्या बांधल्या. पण पायऱ्या जरा उंच आहेत, अरुंद आहेत. सर्व पायऱ्या चढून जाण्यास बराच वेळ लागतो म्हणून भाविक यात्रेकरू भल्या पहाटे पायऱ्या चढण्यास प्रारंभ करतात. वर जाऊन दत्तपादुकांचे दर्शन घेऊन प्रदक्षिणा घालून परत पायथ्याशी यायला मध्यान्ह उलटून जाते, कित्येकदा सायंकाळ होते.




गुरुशिखराकडे जाण्याचा रस्ता, गिरनार

गिरनार पर्वतावर शाक्तपंथीय, दत्तपंथीय, जैनपंथीय धार्मिक यात्रेकरूंचा भरणा असतो. त्यांत बहुसंख्य यात्रिक जैनपंथीय असतात. पालिठाण्याची शत्रुंजय यात्रा ही जैनांची

मोठी तीर्थयात्रा. ही यात्रा गिरनार पर्वत चढून गेल्याशिवाय संपूर्ण होत नाही, अशी जैन बांधवांची श्रद्धा आहे.

गिरनार पर्वताची एकंदर शिखरे एकवीस असून त्यातील पाच शिखरे सुप्रसिद्ध आहेत, ती अशी : अंबा, गोरख, नेमिनाथ, गुरू आणि कालिका. गिरनारची अर्धी चढण चढून गेले की पहिले शिखर येते ते अंबा शिखर – शिखराला येथे टूक म्हणतात. अंबामातेचे मंदिर प्रशस्त असून ते बावन्न सुप्रसिद्ध शक्तिपीठांपैकी एक पवित्र स्थान आहे, असे मानतात. सौराष्ट्रातील कित्येक कुटुंबे लग्न झाल्यावर या ठिकाणी वधुवरांना दर्शनास घेऊन येतात. ही अंबा कित्येक गुर्जर बंधूंचीही कुलदेवता आहे. येथील अंबामातेचे दर्शन घेऊन पुढे चढून गेल्यावर दुसरे शिखर गोरक्ष शिखर म्हणून सुप्रसिद्ध आहे. या ठिकाणी नाथपंथीय गोरखनाथ तपश्चर्येसाठी येऊन राहिले होते. गोरखनाथ हे साक्षात्कारी साधू. ते येथे धुनी पेटवून योगसाधना करीत. त्यांना अनेक सिद्धी प्राप्त झाल्या होत्या. त्यांचे गुरू मच्छिंद्रनाथ म्हणून प्रसिद्ध होते. गुरू मच्छिंद्रनाथ आणि शिष्य गोरखनाथ हे अखिल भारतात संचार करीत. त्यांच्या संचाराने पुनीत झाले नाही, असे एकही स्थळ भारतात नाही. निवृत्तिनाथांचेही ते गुरू होते. त्र्यंबकेश्वर पर्वतातील एका गुहेत निवृत्तिनाथ असताना गोरखनाथांची आणि निवृत्तिनाथांची गाठ पडली. त्या प्रसंगी निवृत्तीनाथांना नाथपंथीय दीक्षा, सिद्धी आणि गुरूचा वरदहस्त लाभला. गिरनार पर्वतावर गोरक्ष किंवा गोरखशिखरावर गोरखनाथांनी पेटवलेली धुनी अजूनही

पेटलेली तेवत असते. उखीमठ येथे ज्याप्रमाणे अनिरुद्ध-उषा यांच्या विवाहसमयी वेळचा अग्नी आजपर्यंत पेटत ठेवलेला आढळून येतो, त्याप्रमाणे गोरखनाथाची ही धुनी सारखी पेटलेली आढळते. भाविक लोक या धुनीत लाकडे वगैरे अर्पण करून आपली भक्तिभावना प्रगट करतात.



नेमिनाथमंदिर, गिरनार

गोरखशिखरानंतर येते ते नेमिनाथशिखर. हे जैनांचे पवित्र स्थान. चढायला कठीण, पायऱ्या नाहीत. रस्ता दुर्गम. तरीही भक्तमंडळी वर जाऊन नेमिनाथाचे दर्शन घेत असतात. नेमिनाथाचे मंदिर प्रेक्षणीय व समृद्ध आहे. नेमिनाथ हा जैनांचा बाविसावा तीर्थंकर होय. कृष्ण व बलराम यांचा तो चुलत भाऊ लागतो, असे जैन पुराणे

सांगतात. श्रीकृष्णाच्या हातात असतो त्याप्रमाणे नेमिनाथाच्या हातात पांचजन्य शंख असतो. नेमिनाथाची मूर्ती शाळिग्राम शिळेची काळी कुळकुळीत आहे. रत्नालंकारांनी मूर्ती सुशोभित करतात, तेव्हा त्या मूर्तीचे दर्शन अपूर्व असते. मंदिर दगडी असून मंदिराचा सभामंडप बावीस स्तंभांवर आधारलेला प्रशस्त आहे. हे देवस्थान किल्लेवजा आहे. भोवती साठ ओवऱ्या बांधलेल्या आहेत. वस्तुपाल व तेजपाल या बंधुद्वयाने त्याच आवारात उभारलेली मंदिरे भव्य आणि कलापूर्ण आहेत.

या पर्वतावर गोमुखी, हनुमानधारा आणि कमंडलू ही तीन कुंडे असून पायथ्याशी दामोदर कुंड आहे. भैरवजप (भैरवझाप) नावाचा एक कडा आहे. या कड्यावरून उडी टाकल्यास मोक्ष मिळतो असे भाविक लोक मानीत व कड्यावरून उडी टाकून देहत्याग करीत. आता या गोष्टीस बंदी आहे.

यापुढचे शिखर दत्तशिखर. हे सर्वांत उंच आहे. सुप्रसिद्ध नाथपंथीय गोरखनाथाची तपोभूमी म्हणून हे ठिकाण ओळखले जाते. दत्तशिखरावर प्रत्यक्ष दत्तात्रेयाने तप केले व ते त्यांच्या साधनेचे ठिकाण जन्मस्थानाप्रमाणे फार पवित्र मानतात. या ठिकाणी दत्तपादुका असून भोवती प्रदक्षिणेपुरतीच वाट आहे. साधकांना स्फूर्ती देणारे हे रमणीय ठिकाण प्रत्येक दत्तभक्ताने अवश्य भेट देण्याजोगे तर आहेच, पण येथे येऊन निसर्गरमणीय स्थानाप्रमाणे दत्तपादुकांचे दर्शन घेऊन अंतःकरणात पावित्र्य, शांती व दिव्य भावना उमटणार नाहीत असा

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
१५७८

मनुष्य विरळा. अनेक भक्तांचे येथील अनुभव ऐकायला मिळतात. या ठिकाणच्या दत्तपादुकास्थानी साधना



श्रीदत्तपादुका, गिरनार

केल्यावर प्रत्यक्ष भगवान् दत्तात्रेयांचे दर्शन घडते, साक्षात्कार होतो व जीवन उजळून निघते. असे अनुभव काही साक्षात्कारी श्रेष्ठ व्यक्तींचे आहेत. त्यांत निरंजन रघुनाथ, किनाराम अघोरी, नारायण महाराज जालवणकर, योगी विष्णु भास्कर लेले वगैरे दत्तोपासक आहेत. असे हे स्थान अत्यंत रमणीय, पवित्र, स्फूर्तिदायक असे आहे.

प्राचीन काळी गिरनार शिखराला ऊर्जयंत अथवा रैवतक पर्वत, प्रभास पर्वत, वस्त्रापथ क्षेत्र इत्यादी नावे

होती. या ठिकाणी हिंदू, जैन, इस्लाम अशा निरनिराळ्या संस्कृती नांदल्या. एकेकाळी यादव वीरांची ही क्रीडाभूमी होती.

या ठिकाणची एक पौराणिक कथा अशी सांगतात : एकदा शिव-पार्वती कैलासावर बसली असता ब्रह्मादी देव तेथे आले आणि म्हणाले, "हे शिवशंकरा, तू दैत्यांवर कृपा करतोस हे ठीक नव्हे.". देवाचा पुढाकार विष्णूने घेतला होता. त्यावर भगवान शिव म्हणाले, "मी आशुतोष आहे. जो निष्ठेने माझी भक्ती करतो, त्याला मी प्रसन्न होतो; मग तो देव असो वा दैत्य असो! तुम्हांला ही गोष्ट मान्य नसेल तर मी इथून निघून जातो."

मग भगवान् शिव कैलासाहून निघाले, ते गिरनार पर्वतावर येऊन स्थिर झाले. इकडे देव आणि पार्वती त्यांचा शोध करू लागली. गिरनार पर्वतावर शिव गुप्त रूपाने राहत होते. शिव प्रगट व्हावे म्हणून पार्वतीने येथे तपश्चर्या केली. शिव प्रसन्न होऊन त्यांनी दर्शन दिले. मग पार्वतीने आग्रह धरला आणि कैलासावर चलण्यासाठी ती विनवू लागली. शिव म्हणाले, "सर्व देव येथे राहत असतील, तर मी कैलासाला येईन." त्यानंतर अंशरूपाने सर्व देव गिरनार पर्वतावर राहिले आणि शिवपार्वती मूळ रूपाने पुन: कैलासाला गेली. गिरनार पर्वताच्या एका शिखरावर विष्णूंनी वास्तव्य केले व दुसऱ्या शिखरावर पार्वती अंबामाता स्वरूपात राहिली. शिवाने या ठिकाणी वस्त्रे उतरली म्हणून या क्षेत्राचे नाव वस्त्रापथ क्षेत्र पडले.

श्रीकृष्णाच्या काळातील या रैवतक पर्वतावरील सर्वात महत्त्वाची घटना म्हणजे सुभद्राहरण ही होय. या पर्वतावरील यात्रेचा प्रसंग साधून अर्जुनाने त्रिदंडी संन्यासाचे सोंग घेतले व सुभद्रेचे हरण केले अशी कथा आहे.

दत्तप्रबोध ग्रंथात वामनबुवांनी याचे वर्णन केले आहे ते असे :

एका शृंगावरी गोरखनाथ ।
दुसरे शृंगावरी हिंगळजा देवी वसत ।।
तिसरे शृंगावरी स्वये अवधूत ।
विश्रांति घेत हिंडतो ।।
नवनाथ चौऱ्यांशी सिद्ध ।
येथे वसती गा प्रसिद्ध ।।
दत्त अविनाशी तू स्वतः सिद्ध
अद्वय अभेद सर्वातीत ।।
हिंदु आणि मुसलमान ।
यासाठी रूपे दोन ।।
दत्त दातार अभिमान ।
द्वय स्थान शोभविले ।।

# ५ : डाकोर

डाकोर हे वैष्णव पंथियांचे स्थान म्हणून सुप्रसिद्ध आहे. मुंबई-अहमदाबाद या पश्चिम रेल्वे फाटयावर आनंद स्टेशनपासून सुमारे एकोणीस मैल अंतरावर डाकोरचे मंदिर आहे. उमरेठ मार्गे नडियादहूनही या ठिकाणी जाता येते.

गुजराथमध्ये वैष्णव पंथीय अनेक संप्रदाय आहेत. पण डाकोरचे वैशिष्टय असे की या रणछोडजीचे उपासक सर्व पंथियांत आणि सर्व जाती-उपजातींतील असून डाकोर हे हिंदूंचेही महान पवित्र तीर्थक्षेत्र बनले आहे. या संबंधीची कथा सांगतात ती अशी : द्वारकाधीश श्रीकृष्णाचा महान उपासक म्हणून वजेसिंग अथवा बोडाणो या नावाचा एक सुप्रसिद्ध राजपूत भक्त होऊन गेला. आपल्या हातावर तुलसीचे रोप वाढवून तो वर्षातून निदान दोनदा डाकोर-हून द्वारकेला चालत चालत जाई. त्याची ही पदयात्रा अनेक वर्षे चालू होती. हातावर वाढलेल्या तुलसीची पत्रे द्वारकेला जाऊन तो अनन्य भक्तीने रणछोडजीला वाहत असे.


मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ४१३५३ वि: ४५-४११६
क्रमांक ३८९ नों. दि: १५।२।६८

कालान्तराने वृद्धापकाळामुळे त्याला ही पदयात्रा जमेना. त्याच्या भक्तिभावाने द्वारकाधीश संतुष्ट झाला होता. त्याला त्याची दया आली. मग स्वतः द्वारकाधीशाने बोडाणोला स्वप्नात संदेश दिला की, आता तू दरसाल द्वारकेला माझ्या दर्शनास येण्याचे कारण नाही. द्वारकाधीशाची मूर्तीच आपण होऊन तुझ्या मागोमाग डाकोरला येईल. या स्वप्नातील आदेशाप्रमाणे बोडाणो मध्यरात्री द्वारकेच्या रणछोडजीच्या मंदिरात गेला. तेथून रणछोडजीची मूर्ती उचलून घेऊन तो निघाला. ती एका बैलगाडीत ठेवून बैलगाडी डाकोरच्या दिशेने चालू झाली. परमेश्वरी कृपेने बैलगाडी डाकोरला सुरक्षिपणे येऊन पोहोचली. दुसऱ्या दिवशी पहाटे गुगळी पुजारी द्वारकाधीश मंदिरात नित्याप्रमाणे काकड आरती करण्यास येऊन पाहतात तो मूर्ती चोरीस गेलेली. जिकडे तिकडे चौकशी सुरू झाली. बोडाणोचा संशय आला होता, म्हणून त्याचा शोध घेत घेत मंडळी निघाली.

द्वारकेतील पुजारी भक्तगण शोधासाठी निघाले. त्यांनी आपल्याबरोबर शस्त्रांनी-बाणांनी सुसज्ज असे काबा लोक घेतले होते. इतक्या अवधीत बोडाणो डाकोरला येऊन पोहचलाही होता. मध्यंतरी बोडाणोला उमरेठ आणि डाकोर यांच्या मधोमध मुक्काम करावा लागला होता. त्या ठिकाणी या मूर्तीची पदचिन्हे उमटलेली स्थळे अजूनही दाखवतात. तेथे रणछोडजीने एका कडुलिंबाच्या झाडाला स्पर्श केला होता. पण त्यामुळे कडुलिंबाचा कडवटपणा नाहीसा होऊन या कडुलिंबाच्या वृक्षाची पाने

गोड व मधुर झाली आहेत. अशी एक आख्यायिका प्रसिद्ध आहे.

भगवंताच्या आदेशानुसार बोडाणोने रणछोडजीची मूर्ती गोमती तलावात लपवून ठेवली. आपल्या मागोमाग पाठलाग करीत गुगळी ब्राह्मण द्वारकेहून निघाले आहेत



तलाव आणि मंदिरे डाकोर

ही बातमी त्याला समजली होती. त्यांना ही मूर्ती दृष्टीस पडू नये म्हणून गोमती तलावात लपवून ठेवण्याची युक्ती केली होती. पुढे काबाच्या शरसंधानाला बोडाणो बळी पडला आणि गुगली पुजाऱ्यांनी त्याच्या विधवेशी बोलणे सुरू केले. ते म्हणाले, "तुझ्या पतीने द्वारकेहून रणछोड-जीची मूर्ती पळवून आणली आहे, ती आम्हांला दे." तिला मूर्ती कोठे आहे ते माहीत नव्हते. मग ती कोठून देणार?

काहींनी गोमती तलावात शरसंधान केले; ते बाण तलावातील मूर्तीला लागले.

तलावातून मूर्ती हुडकून काढण्यात आली. मग ही मूर्ती द्वारकेला नेण्यासंबंधी डाकोरच्या ग्रामस्थांत आणि पुजाऱ्यांत वाद सुरू झाला. अखेरीस वादाचा निर्णय असा झाला. ही मूर्ती न नेता रणछोडजीच्या वजनाइतके सोने नुकसानभरपाई म्हणून द्वारकेच्या पुजाऱ्यांनी स्वीकारावे. त्यांना स्वप्नात ईश्वरी संदेशही मिळाला तो असा की, ही मूर्ती द्वारकेस न नेता सावित्री तीर्थात एक मूर्ती सापडेल ती नेऊन द्वारकेच्या मंदिरात स्थापन करावी. या आदेशाप्रमाणे पुजाऱ्यांनी मूर्तीच्या वजनाइतके सोने नेण्याची कबुली दिली आणि दुसरी मूर्ती स्थापन करण्याचे ठरविले. पण हे सोने देणार कोण ? बोडाणोच्या विधवा पत्नीने आपल्या अंगावरील सोने देऊन भरपाई करावी असे ठरले. गरीब बिचारी बोडाणोची विधवा पत्नी. तिच्या अंगावर सोने ते काय असणार ? पण तिच्या मदतीस प्रत्यक्ष भगवान धावून आले. तराजूच्या एका पारड्यात मूर्ती ठेवली. दुसऱ्या पारड्यात नाकातील नथणी ठेवण्यात आली. नथणीचे वजन फार हलके ! लोकांना ही थट्टाच वाटली; पण काय आश्चर्य ! मूर्तीचे पारडे वर झाले; तिचे वजन नथणीपेक्षाही कमी भरले ! पुजारी निराश झाले. एवढी नथणी घेऊन काय करणार ? ते तसेच परत गेले, पुढे काही कालानंतर सावित्री तलावात त्यांना रणछोडजीची एक मूर्ती सापडली. मग त्या मूर्तीची विधियुक्त प्रतिस्ठापना रणछोडजी मंदिरात करण्यात

आली. आता असे म्हणतात, की दिवसातील जवळजवळ सर्व काळ भगवान डाकोरच्या मंदिरात असतात व अगदी थोडा वेळ द्वारकेच्या रणछोडजी मंदिरात राहतात.


डाकोरच्या मंदिरातील रणछोडजीची मूर्ती द्वारकेहून आणली असण्याची शक्यता जास्त दिसते. कवी गोपालदास यांनी नमूद केल्याप्रमाणे संवत १२१२ कार्तिकी पौर्णिमेच्या रात्री बोडाणोने ही मूर्ती डाकोरला आणली. अर्थात या तिथीला ऐतिहासिक खात्रीलायक पुरावा मिळत नाही.

पूज्य श्री. दुर्गाशंकर शास्त्रींच्या मते महमद गझनीच्या काळापर्यंत द्वारकेला वैष्णव तीर्थ असे पवित्र स्थान प्राप्त झाले नव्हते. हे माहात्म्य त्या स्थळाला लाभले ते संवत १२०० नंतर.

दुसरी एक आश्चर्याची हकीकत अशी : डाकोरचे रणछोडजी मंदिर इ. स. १७७२ साली गोपाळ जगन्नाथ तांबेकर या महाराष्ट्रीय गृहस्थांनी जवळ जवळ एक लाख रुपये खर्च करून बांधले. श्री. तांबेकर हे अतिशय श्रीमंत आणि पेशव्यांचे सावकार म्हणून सुप्रसिद्ध होते. या मंदिराच्या खर्चासाठी, पूजाअर्चा, उत्सव-समारंभ इ. व्यवस्थांसाठी इनामी गावे देण्यात आली होती. अनेक संस्थानिकांनी, राजेरजवाड्यांनी, सरदारांनी या देवालयास उदार हस्ते मदत केली, द्रव्यसाहाय दिले, बडोद्याचे महाराज गायकवाड सरकार यांनी रणछोडजीच्या सुवर्णसिंहासनासाठी १,२५,००० रुपयांची देणगी दिली.

डाकोरच्या रणछोडजी मंदिराची बांधणी सुबक,

डौलदार असून हे मंदिर म्हणजे शिल्पकलेचा एक उत्कृष्ट नमुना आहे. उत्तरेस आणि पश्चिमेस मंदिरात प्रवेश करण्यासाठी भव्य प्रवेशद्वारे आहेत. मंदिरासमोर प्रशस्त चौक आणि अंगण आहे, रणछोडजीची मूर्ती द्वारकेतील द्वारकाधीशाच्या मूर्तीप्रमाणे आहे. डावीकडील दोन्ही हातांत शंख-चक्र व उजव्या हातात गदा व पद्म विराजत आहे. ही मूर्ती चतुर्भुज पश्चिमाभिमुख उभी आहे. पुढे



रणछोडजी, डाकोर

खुले प्रांगण आहे. सभोवती प्रदक्षिणेसाठी प्रशस्त रस्ता आहे. पादस्पर्शदर्शन व पूजन करता येते. डाकोरनाथ हा न देव "कनकनारायण" बनला आहे. त्याच्या

नैवेद्याला २२ रोटले, ३७ लहानमोठे लाडू, १ रत्तल लोणचे, २ शेर मसाल्याचे दूध ही सकाळची न्याहारी असते. दुपारच्या व संध्याकाळच्या भोजनव्यवस्थेचा थाट अगदी अपूर्व आहे. भक्तगण दर्शनास येताना उपहार भेट म्हणून देवाला वस्त्रालंकार आणि द्रव्य अर्पण करतात. पादस्पर्श करून देवदर्शन घेता येते. मूर्तीच्या अंगावर भरजरी वस्त्रे व रत्नजडित सुवर्णालंकार चकाकत असतात. भक्तगणांनी अर्पण करताना दक्षता घ्यावयाची व जे अर्पण करावयाचे ते बंद केलेल्या तिजोऱ्यांत अगर घागरीतील फटीतून टाकावयाचे.

जवळच गोमती तीर्थ आहे. गोमती तीर्थाचे जल पवित्र मानले असून त्यात स्नान केल्याने पापक्षालन होते अशी भाविकांची श्रद्धा आहे. भक्तगणांपैकी पुरुष या ठिकाणी क्षौर करून स्नान करतात. श्राद्धविधीही गोमती तीर्थावर उरकले जातात. गोमती तीर्थाला सुंदर घाट बांधला असून या तीर्थाजवळच रणछोडजीची मूर्ती पारड्यात घालून तोलली होती असे म्हणतात. त्रिकमजीचे व बोडाणो भक्ताचे मंदिरही जवळच आहे.

हल्ली मात्र गोमती तीर्थाचे स्वरूप बदलले आहे. पाणी अस्वच्छ-अपवित्र असे वाटते. उपसा नाही त्यामुळे शेवाळे वाढलेले. त्यातच लोक अंग धुतात, कपडे धुतात, क्षौरविधी, श्राद्धविधी उरकले जातात त्यामुळे मूळचे पावित्र्य व पाण्याची स्वच्छता बिघडून गेलेली आहे.

डाकोरला मुख्यत्वे ब्राह्मण पुजाऱ्यांची वस्ती असून डाकोरनाथाच्या पूजाअर्चेवर हे लोक गुजराण करून बक,

भक्तगण जे देवाला अर्पण करतात. तेच त्यांच्या उत्पन्नाचे आणि उपजीविकेचे मुख्य साधन होय. आता मात्र ' डाकोर-मंदिर, देवस्थान-संस्था ' स्थापन करण्यात आली असून या संस्थेतर्फे डाकोरनाथाच्या पूजाअर्चेची, उत्सव समारंभाची सर्व व्यवस्था केली जाते. देवालयातील प्रांगणात, गाभाऱ्यात अतिशय स्वच्छता राखली जाते. दर पौर्णिमेला मोठी यात्रा भरते. आश्विनी पौर्णिमेस भरणारी यात्रा सर्वांत मोठी असते. लाखो यात्रेकरू सर्व भागांतून दर्शनास येत असतात. त्या वेळी स्पेशल रेल्वे गाड्यांतून, मोटारी, बैलगाड्या वगैरे वाहनांतून लोक येत राहतात, तुळसीपत्रे, लोणी, खडीसाखर हे नैवेद्य व इतर पक्वान्नांचे भोग देवास अर्पण करतात. भोग आणि सेवा यांचे प्रकार अनेक असून त्यांच्या वेळा ठरलेल्या आहेत. त्याप्रमाणे सर्व समारंभ साजरे होत असतात.

अखिल गुजरातेत अनेक संप्रदाय, पंथ, उपपंथ प्रचलित आहेत. शक्तिदेवीचे उपासक, भगवान विष्णूची व नारायणाची उपासना करणारे रामानुजांचे अनुयायी, रामानंद कबीर संप्रदायी, वल्लभाचार्य, स्वामीनारायण संप्रदायी, बालमुकुंद संप्रदायी असे अनेक आहेत. डाकोरचे मंदिर हे या सर्व संप्रदायांना व भक्तांना मान्य असून त्याचे उपासक सर्व भारतभर पसरलेले आहेत.

देवस्थानचे उत्पन्न कित्येक लाखांनी भरेल. गुजराती लोक दानशूर, व श्रीकृष्णाचे उपासक, भाविक म्हणून प्रसिद्ध असल्याने मंदिराला दर्शनासाठी येणारे भक्त सढळ ंनी द्रव्यार्पण करतात, दानधर्म करतात. " जय

गोपालजी", "जय रणछोडजी" या उद्‌गारांनी मंदिर दुमदुमलेले असते.

'रणछोडजी' म्हणजे भगवान गोपालकृष्णाचे सोज्वळ बालमुकुंद स्वरूप, देव गोजिरवाणा, सुंदर, बाळसेदार, मोहक, बासरीवाला! मूर्तीवर ठायीठायी रत्नजडित सुवर्णालंकार, माथ्यावर मोरपिसांचा रत्नजडित मोरमुकुट, गळ्यात रत्नांच्या कौस्तुभमाला, पायांत पैंजण, नाकात नथणी, कानांत कर्णभूषणे, हातांत सुवर्णकडी, बोटांत अंगठ्या! असे किती म्हणून वर्णन करावे? देवाचे कोडकौतुक करण्यासाठी यशोदामाता ज्या तऱ्हेने दही-दूध-लोणी-मोदक बालकृष्णास खायला देई, तसेच सोहाळे, भोग देवास अर्पण केले जातात. काकड-आरतीपासून शेजारतीपर्यंत सर्व सोहाळे समारंभाने साजरे होत असतात. हे उपचार चालले असताना भक्तगणांना वाटेल तेव्हा मूर्तीचे दर्शन कसे होणार? देव भोजनात गुंतले आहेत. देवांचे स्नान चालले आहे, देव वामकुक्षी करीत पहुडले आहेत, तेव्हा दर्शन होणार नाही. मग यात्रिक कितीही लांबून का आलेले असेनात. ठराविक वेळीच दर्शन घडेल. देवाच्या मुक्तद्वार दर्शनाच्या वेळा ठरलेल्या असतात. त्याच वेळी दर्शन होत असते.

हे वैष्णव क्षेत्र आहे पण कुठल्याही विशिष्ट एका पंथाचे नाही. डाकोरला आता श्री. कन्हैयालाल मुनशीजींच्या प्रयत्नाने मोठे विद्यापीठ होणार आहे. विद्यापीठाची उभारणी झाल्यावर हे एक फार मोठे शैक्षणिक केंद्र म्हणन प्रसिद्धीस येईल.

उत्तरेत जसे गोकुळ, मथुरा, वृंदावन, ओरिसा प्रांतात जसे जगन्नाथाचे मंदिर, तसेच गुजरात प्रांतात द्वारकेस द्वारकाधीशाचे व डाकोरला रणछोडजीचे मंदिर भगवान गोपालकृष्णाच्या वास्तव्याने पुनीत झालेले! गुजराती लोक गोपालकृष्णाचे महान उपासक. गोपालकृष्णाच्या बाललीलांनी हरखून जाऊन त्याचे कौतुक करावे तर त्यांनीच. दही, दूध, लोणी, तूप यांनी समृद्ध असलेला अखिल गुजरात प्रांत त्यातल्या त्यात खेडा जिल्हा व डाकोरविभाग! दही, दूध, लोणी यांना काय तोटा? डाकोरचा प्रांत अत्यंत सुपीक, आम्रवृक्षांनी बहरलेला. धनधान्य विपुल. व्यापारात अग्रेसर. मग डाकोरनाथाच्या कृपेने मिळालेले वैभव वृद्धिंगत होत राहते, अशी गुर्जर बंधूंची दृढ श्रद्धा. त्यांच्या गाण्यात, नृत्यात, उत्सवात, गर्बा नृत्यात गोपालकृष्णाच्या रासक्रीडेचे अनुकरण, टिपऱ्या नृत्ये, यात राधाराणी व गोपालकृष्ण यांच्या बासरी-वादनाची गाणी, मधुर बासरीने गानलुब्ध झालेल्या गोपींची वर्णने. लहानथोर गुर्जरललना या गर्बा नृत्यात रंगून जातात. तनमनाचे भान विसरून जातात. मग डाकोरला गोकुळ-वृंदावनाचे स्वरूप येते. खवा, बर्फी, मोहनभोग, लोणी, खडिसाखर या नैवेद्यांची खैरात होते. गोपाल काला, जन्माष्टमी या महोत्सवांत डाकोरवासी नागरिक व भक्तगण रमून जातात आणि तोंडाने जयघोष चालतो:

गोविंद जय जय, गोपाल जय जय
राधारमण हरि गोविंद जय जय !

## ६ : अरुणाचलम्

अरुणाचलम् हे शब्द उच्चारल्याबरोबर भक्तांच्या अंतःकरणात अननुभूत लहरीवर लहरी येऊ लागतात; त्यांना उपमा सागराच्या लाटांचीच ! हे ठिकाण कोठे आहे ? कसे आहे ? कसे असेल ? या कल्पनांनी मनुष्य भारावून जातो. मग प्रत्यक्ष अरुणाचलम्, अरुणाचलेश्वर यांचे दर्शन झाल्यावर तो हरखून जाईल यात काय संशय ? अशी अवस्था तेथे जाणाऱ्या अनेक साधुसंतांची झाली; त्यांपैकी काही आले आणि तेथेच स्थिरावले. भगवान रमण महर्षि हे आधुनिक युगातील एक साक्षात्कारी संत त्यांपैकीच. निसर्गरमणीय सृष्टिसौंदर्याबरोबर ईश्वरी साक्षात्कार घडवून देणारे हे महान् क्षेत्र मद्रास प्रांतात विल्लुपुरम्-धर्मावरम् या रेल्वे फाट्यावर असलेल्या तिरुवण्णमलाई या ठिकाणाहून नजीक आहे. मद्रासहून दक्षिणेच्या दिशेस सुमारे दीडशे मैलांवर हे ठिकाण आहे.

तिरुवण्णमलाई या ठिकाणाचे दुसरे नाव अरुणाचलम्. या शहराच्या पाठीशी अरुणाचलम्चा डोंगर असून त्याची उंची समुद्रसपाटीपासून २६६८ फूट आहे. पायथ्याशी

भगवान अरुणाचलेश्वराचे मंदिर असून ते तेजतत्त्वाचे प्रतीक मानले जाते. भगवान शंकर पृथ्वी, आप, तेज, वायू आणि आकाश या स्वरूपात ठिकठिकाणी वावरतात. त्यांपैकी तेजस्वरूपात ते अरुणाचल या ठिकाणी येऊन स्थिरावले; त्यामुळे या क्षेत्राला अत्यंत पावित्र्य आणि माहात्म्य प्राप्त झालेले आहे. पुराणातून वर्णन केल्याप्रमाणे पृथ्वीतत्त्व लिंग कांचीवरम येथे, आपतत्त्व लिंग जंबुकेश्वरी, तेजतत्त्व अरुणाचली, वायुतत्त्व कालाहस्तीस, आकाश तत्त्व चिदंबरम् या ठिकाणी स्थिर आहे. अरुणाचलेश्वराचे मंदिर भव्य आणि विस्तृत असून या ठिकाणी वर्षातून दोन वेळा यात्रा भरते. एक मोठी यात्रा कार्तिकात आणि दुसरी चैत्र महिन्यात भरते. यात्रेकरूंची संख्या लाख दीड लाख असते. भारताच्या सर्व भागांतून यात्रेकरू दर्शनासाठी येतात.

अरुणाचलाचे महत्त्व फार पुरातन काळापासून असून त्याचे सविस्तर वर्णन स्कंदपुराणात आढळते. तेजस्-स्वरूपात स्थिरावणाऱ्या भगवान शंकराचे ध्यान म्हणून पहिलाच श्लोक आहे—

ललाटे त्रैपुण्ड्री निटिलकृतकस्तूरितिलकः
स्फुरन् मालातेजः स्फुरितकटिकौपीनवसनः ।
दधानो दुस्तारं शिरसि फणिराजं शशिकलां
प्रदीपः सर्वेषां अरुणगिरियोगी विजयते ।।

(भगवान शंकराच्या ललाटावर त्रिपुण्ड्र असून कपाळावर कस्तुरी तिलक विराजत आहे. त्याच्या गळ्यातील माळा तेजाने तळपत आहेत; कमरेला व्याघ्राजिन लपेटलेले आहे. मस्तकावरील जटेत फुसफुसणारे सर्प

आहेत आणि मस्तकावर मध्यभागी चंद्रकोर सुशोभित आहे. भगवान् शंकर देदीप्यमान, सर्वांना प्रकाश देणारा आहे. असा अरुणाचलयोगी भगवान शंकर विजयी असो. )

यासंबंधी पौराणिक कथा मनोरंजक आहे: एकदा विष्णु आणि ब्रह्मदेव या दोघांत श्रेष्ठ कोण याबद्दल भांडण सुरू झाले. दोघेही युद्ध करू लागले. इतक्यात त्या दोघांमध्ये अग्निज्वालेच्या स्वरूपात भगवान शंकर प्रगट झाले. आकाशवाणी झाली. त्याबरोबर विष्णु आणि ब्रह्मदेव या दोघांनी आपले द्वंद्व युद्ध थांबवले. मग ही मध्येच उत्पन्न झालेली अग्निशलाका कोठे कशी उत्पन्न झाली ? त्याचा प्रारंभ कोठून आणि शेवट कोठे ? हे पाहण्यासाठी विष्णूने अस्वलाचे व ब्रह्मदेवाने हंसाचे रूप धारण करून ते शोध घ्यायला निघाले. पण कितीही प्रयत्न केले तरी या अग्निशलकेचे स्वरूप त्यांना शोधून काढता येईना. उगमही कळेना आणि अंतही कोठे ते उमगेना. मग हताश होऊन दोघेही परत आले आणि त्यांनी भगवान शंकराची आराधना सुरू केली. त्यांच्या आराधनेला भगवान प्रसन्न झाले आणि ही अग्निशलाका हेच आपले स्वरूप असे दर्शवून ते त्याच ठिकाणी स्थिर झाले; त्यांचे दृश्य स्वरूप म्हणजेच अरुणाचलम् पर्वत.

दुसरी एक पौराणिक कथा अशी आहे: शिव आणि पार्वती दोघे खेळात रमली असताना एकदा थट्टेने भगवान शंकराचे तिन्ही नेत्र पार्वतीने हाताने झाकले. काही क्षणच गेले असतील पण तेवढ्याने पृथ्वीवर काय हाहाकार झाला याची तिला काय कल्पना ? हे तीन नेत्र म्हणजे

सूर्य, चंद्र आणि अग्नी. त्यांचा अस्त निमिषमात्र झाला खरा, पण त्यामुळे पृथ्वीवरील कालाची कित्येक वर्षे लोटली ! पृथ्वीवरील प्राणी पटापट मरू लागले. प्रलय-काळ ओढवला, असे दृश्य दिसू लागले. आपल्या पुण्याईच्या जोरावर काही संत महात्मे मात्र तपोबलाने टिकून होते. त्यांची अनन्य भावे प्रार्थना सुरू झाली. ती भगवान शंकरांना ऐकू येऊ लागल्यावर ते रागाने पार्वतीला म्हणाले, "तुझ्या हातून थट्टेने पण घोर कृत्य घडले आहे. पृथ्वीवर हाहाकार उडाला आहे. याचे प्रायश्चित्त तुला घ्यावे लागेल. यासाठी तू तप आणि ध्यान करण्यासाठी येथून निघून जा."


भगवान शंकरांच्या या आज्ञेप्रमाणे देवी पार्वती तप-श्चर्येसाठी कांची शहरी आली आणि एका आम्रवृक्षाखाली तिने तपश्चर्येस सुरवात केली. तिने एक वाळूचे शिवलिंग तयार केले. तिची परीक्षा व चिकाटी पाहण्यासाठी शंकरांनी महापुराचे पाणी आणवून तो भाग वेढून टाकला. पण तिने आपले आसन सोडले नाही. तिने शिवलिंग वाचविण्याचा जास्तीत जास्त यत्न केला. तिच्या हाताची बोटे व कंकणांचे कंगोरे कांची येथील शिवलिंगावर अजूनही उमटलेले दिसून येतात ! मग आकाशवाणी झाली. पार्वतीला अभयवचन मिळाले. "तू महर्षी गौतमांच्या अरुणाचलावर असलेल्या आश्रमाकडे जा आणि तेथे तुझ्या तपास सुरुवात कर." त्याप्रमाणे पार्वती अरुणाचलावर गौतम ऋषींच्या आश्रमात आली. गौतम ऋषींनी तिचे स्वागत केले आणि अरुणाचलाचे माहात्म्य

वर्णन करून सांगितले. ते म्हणाले, "हा अरुणगिरी कृतयुगात ज्वालारूप होता. त्रेतायुगात या गिरीचे रत्नांच्या पर्वतात रूपांतर झाले. द्वापर युगात हा सुवर्णगिरी म्हणून प्रसिद्ध होता आणि कलियुगात या गिरीचे स्वरूप मर्कत या रत्नाप्रमाणे आहे."

अरुणाचल हा पूर्वी ज्वालामुखी पर्वत असावा. तो हजारो वर्षांनंतर थंडावला व त्याचे स्वरूप बदलत बदलत आज दिसते त्याप्रमाणे झाले असावे.

गौतम ऋषींच्या सूचनेप्रमाणे पार्वती अरुणाचल पर्वतावर ध्यानस्थ असता महिषासुर राक्षसाने येऊन तिच्या तपश्चर्येत विघ्न आणले. भगवती पार्वतीने मग उग्र दुर्गेचे स्वरूप धारण केले. तिच्या नेत्रांतून ज्वाला निघू लागल्या. तिने महिषासुराचे पारिपत्य केले म्हणून तिला महिषासुरमर्दिनी हे नामाभिधान प्राप्त झाले. महिषासुर हा महान शंकरभक्त होता. त्याच्या हत्येचे पातक निवारण कसे करावे, या चिंतेत पार्वती असताना गौतम ऋषींनी तिला मार्ग सुचविला, "तू आपले खड्ग या अरुणगिरीवर खुपसून ठेव." त्याप्रमाणे तिने केले ! त्याच ठिकाणी मग पावन तीर्थ उत्पन्न झाले. त्यालाच 'खड्गतीर्थ' म्हणतात. महिषासुर नेहमी आपल्या मस्तकावर शिवलिंग धारण करीत असे. मग पार्वतीने या खड्गतीर्थावर त्या शिवलिंगाची स्थापना केली. कार्तिक महिन्यातील कृत्तिका नक्षत्रावर भगवान शिवाची प्रार्थना करून त्याला संतुष्ट करण्यात येते. म्हणून कार्तिकी पौर्णिमेला अरुणाचलावर प्रचंड प्रमाणात दीपोत्सव साजरा करण्यात येतो. कार्तिकी

पौर्णिमेला पुजारी, उपासक आणि भक्तगण मिळून अरुणाचलावर प्रचंड दीप पाजळतात. ज्योतिस्वरूपात प्रकाशस्तंभाच्या रूपाने पार्वतीला भगवान शंकरांचे दर्शन झाले. त्याची स्मृती ही अशी हजारो वर्षांपासून जागृत ठेवली जाते. हा दीपोत्सव पाहण्यास हजारो यात्रेकरू लोटतात.



अरुणाचलेश्वर मंदिर व त्याचा परिसर

स्कंद पुराणात, महेश्वर खंडात, अरुणाचल माहात्म्य वर्णन केलेले आहे. शैवपंथीय लोक अरुणाचलावर स्थिर होऊन राहिलेल्या भगवान शंकराचे महान उपासक आहेत. अरुणाचल हा सर्व पर्वतच भगवान शंकराचे स्वरूप व तो मानवाच्या कल्याणासाठी येथे स्थिर होऊन राहिला आहे, असे त्याचे वर्णन आढळते.

अरुणाचलेश्वराचे भव्य आणि प्रशस्त मंदिर अरुणा-

चल गिरीच्या पायथ्याशी बांधलेले आहे. त्याची बांधणी दक्षिणी मंदिरांप्रमाणे असून त्यावर अनेक गोपुरे विराजत आहेत. मुख्य गोपुराला अकरा मजले असून वर सुवर्ण कळस सूर्यप्रकाशात तळपत असतात. मधल्या मंडपाला सहस्र खांब आहेत. अरुणाचलाला 'सोनाचल' किंवा 'अरुणगिरी' अशीही नावे आहेत.

विजयनगरचे सम्राट कृष्णदेवराय यांनी या देवळाच्या भव्य आणि उत्तुंग मनोऱ्याच्या बांधणीची सुरुवात केली. त्याची सुरुवात इ. स. १५३० मध्ये झाली आणि तंजावरचे सेवाप्पा नाईक यांनी पुढे त्याची पूर्तता केली. मंदिराच्या जवळ एक प्रसन्न जलाशय बांधवला असून तो स्फटिकाप्रमाणे स्वच्छ असलेल्या पाण्याने सदैव तुडुंब भरलेला असतो. तलाव चोहो बाजूंनी बांधला असून त्यात उतरण्यासाठी ठिकठिकाणी पायऱ्या आणि घाट आहेत.

दक्षिण भारतात जी अनेक भव्य आणि रमणीय पवित्र स्थळे आहेत त्यात अरुणाचलाचे वैशिष्टच आणि माहात्म्य आगळेच आहे. या पवित्र स्थळाला लाखो भाविक यात्रेकरू येऊन दर्शन घेऊन पावन होतात. हिमालयावर जसे अनेक ऋषि-मुनी तपश्चर्येसाठी जाऊन स्थिरावले त्याचप्रमाणे भगवती पार्वती माता, गौतम ऋषी यांच्यापासून आजतागायत अनेक संत महंत या अरुणगिरीवर येऊन तपश्चर्येसाठी स्थिरावले. त्यांना तेथे आत्मसाक्षात्कार झाला; भगवान शंकराचे साक्षात दर्शन झाले !

आधुनिक काळात होऊन गेल्या संतमहंतांत भगवान रमण महर्षींचे नाव प्रामुख्याने दुमदुमून राहिले आहे.


अरुणाचल हे नुसते नाव उच्चारल्याबरोबर छोटया व्यंकटरमणाला निरतिशय आनंद झाला. एका अननुभूत ओढीने तो या स्थानाकडे आकर्षिला गेला. " कोणी मला अरुणाचलाचे दर्शन घडवील काय ? " या काकुळतीने केलेल्या त्याच्या विनंतीला प्रत्यक्ष अरुणाचलेश्वरानेच " ओ " दिली असावी. वयाच्या सतराव्या वर्षी साधे निमित्त घडून व्यंकटरमण मजल दरमजल करीत करीत तिरुवण्णमलाईला पोचला; त्याने अरुणाचलेश्वर मंदिर गाठले मात्र अरुणाचलेश्वराचे दर्शन होताच तो भावावेशात म्हणू लागला, " पिताजी, आपल्या दर्शनास आलो आहे. " झाले; या मुलाचा कायाकल्प झाला, त्याच क्षणापासून सर्वसंगपरित्याग करून मौनव्रत धारण करून व्यंकटरमण मंदिरातील परिसरात राहू लागला. तेथूनच पुढे तो अरुणगिरीवरील गुहेत जाऊन स्थिरावला. अनेक वर्षे मौन धारण करून त्याने ध्यानमग्न अवस्थेत तपश्चर्या सुरू केली, ती जीवनाच्या महासमाधिकालापर्यंत सतत तेहेतीस वर्षे ! १९०५ साली प्लेग सुरू झाला. सर्व लोक निघून गेले. पण रमण महर्षी मात्र जागचे हलेनात ! अरुणाचलेश्वराचे सान्निध्यात असताना त्यांना कळिकाळाचीही भीती वाटण्याचे कारण काय ?

व्यंकटरमणांचा या अरुणाचलावर अनन्वित छळ झाला. त्यांच्या जेवण्याखाण्याचे हाल होत; अंगाखाद्यावर पाली, किडे, मुंग्या, मुंगळे चढत. पण व्यंकटरमणांनी आपली मनःशांती ढळू दिली नाही. वृक्षवल्ली, पशू, पक्षी, माकडे, कुत्री, गायी यांच्या सान्निध्यात ते वावरत आणि आपल्या

तपश्चर्येत मग्न होत. शरीराची उपाधी अशी त्यांना कधी वाटत नसे. हळूहळू या मौनी साधूची कीर्ती पसरू लागली. लोक त्यांच्या सान्निध्यात येत, नाना तऱ्हेचे प्रश्न विचारीत. त्या सर्वांना ते उत्तरे देत पण अगदी मोजक्या शब्दांत. "तुम्ही स्वतः कोण आहांत ते प्रथम ओळखा. आत्मज्ञान करून घ्या. मग परमेश्वरदर्शन हे आपोआप घडेलच. निरहंकारी व्हा आणि वासनांवर विजय मिळवा" हा त्यांचा उपदेश. काव्यकंठ महामुनी गणपतिशास्त्री, कपालीशास्त्री, पॉल ब्रंटन, आॅर्थर आॅसबोर्न यांसारखे अनेक भक्त भोवती जमू लागले. व्यंकटरमणांना लोक 'भगवान रमणमहर्षी' या नावाने ओळखू लागले. अरुणाचलाचे महर्षी म्हणून अखिल भारतात आणि परदेशातही त्यांची कीर्ती दुमदुमू लागली. स्वतः भगवान हे प्रसिद्धिपराङ्मुख, साधे, संन्यस्त वृत्तीचे, निगर्वी, निरहंकारी संत होते. त्यांच्या दर्शनाने, त्यांच्या केवळ सान्निध्यात राहण्याने लोकांचा उद्धार झाला. भगवानांच्या मातोश्री त्यांच्याजवळ येऊन राहू लागल्या. मातोश्रींच्या उतारवयात भगवानांनी त्यांची सेवा केली आणि त्यांच्या निधनानंतर त्यांच्या स्मरणार्थ मातृभूतेश्वर या नावाचे मंदिर बांधले. अनेक भक्तांनी अरुणगिरीच्या पायथ्याशी रमणाश्रम स्थापन करून भगवानांना गिरीवरील ठिकाणाहून आश्रमात राहण्यास बोलावले. पुढे भगवान आश्रमात येऊन स्थिर झाले.

आता अरुणाचलम् येथील रमणाश्रमाला कायम संस्थेचे स्वरूप प्राप्त झाले आहे. स्व. रमण महर्षींच्या समाधिमंदिराचा आराखडा आखण्यात आला असून त्याला

अनुसरून बांधकाम सुरू झाले आहे. भगवन्ताच्या महा-निर्याणानंतर १९५० साली समाधी बांधण्यात आली. भगवान जेथे मंचकावर बसत असत त्या ठिकाणी त्यांचे छायाचित्र ठेवले आहे. त्याकडे निरखून पाहिले म्हणजे भगवान भक्ताकडे प्रेमळ कृपादृष्टीने पाहत आहेत असा भास होतो. भगवान रमण महर्षींचे दर्शन अजूनही अनेकांना होत असते. रमणगीता, सद्दर्शन या त्यांच्या ग्रंथांना चिरस्थायी अध्यात्म ग्रंथांचे स्वरूप प्राप्त झाले आहे. आता अरुणाचलम् हे नाव उच्चारल्याबरोबर भगवान रमण महर्षींचे स्मरण व्हावे आणि भगवन्ताचे नाव उच्चारल्याबरोबर अरुणाचलेश्वराचे स्मरण व्हावे, एवढे महत्त्व या स्थळाला दोन्ही नावांनी प्राप्त झाले आहे. पुंडलिकामुळे जशी पंढरी दुमदुमून राहिली, तशी भगवान रमण



भगवान रमण महर्षींच्या समाधिस्थानाचा आराखडा

महर्षींच्या सान्निध्यामुळे अरुणाचलाचे नाव दुमदुमून राहिले. भक्तगण जेवढ्या भावनेने आणि प्रेमाने अरुणाचलेश्वर महादेवाचे, अरुणाचलाचे, खड्गतीर्थाचे दर्शन घेतात, तितक्याच भक्तीने मातृभूतेश्वर मंदिर, रमणाश्रम, भगवान रमण महर्षींची समाधी यांचे दर्शन घेऊन पावन होतात.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ४१३५३ दि: २५-अक्टो
क्रमांक ३९ नोंद दि: १५/५/६८


# ७ : चिदंबरम्

मद्रासहून दीडशे मैलांवर दक्षिणेच्या दिशेला असलेले चिदंबरम् हे शहर दक्षिण भारतातील एक अत्यंत पवित्र तीर्थक्षेत्र म्हणून प्रसिद्ध आहे, नटराज शिवाचे प्रचंड देऊळ हे या शहराचे सर्वांत मोठे वैभव. येथील नटराजाच्या मंदिरात श्रीशिवाची मूर्ती नटराजाच्या रूपाने नटलेली आहे. येथे प्राचीन काळी पल्लव, चोल, पांड्य नायक आणि विजयानगरचे राजे यांनी बांधलेल्या मंदिरांची भव्य गोपुरे, त्यातील प्रशस्त मंडप आणि शिल्पकलेची वैशिष्टये पाहून पूर्वीच्या राजेरजवाड्यांच्या वैभवपूर्ण कलाप्रियतेची साक्ष पटते. शिवमंदिराच्या पूर्वेस आणि पश्चिमेस दोन मनोरे फार महत्त्वाचे समजले जातात. भरतनाटयम् नृत्य-प्रकारात नृत्याच्या १०८ अवस्था वर्णिलेल्या आहेत. त्यांपैकी बहुतेक सर्व अवस्था शिल्पाकृतीतून मंदिरांच्या गोपुरावर व मनोऱ्यावर चित्रित केल्या आहेत.

चिदंबरम् हे फार पुरातन काळापासूनचे प्रसिद्ध यात्रा-क्षेत्र. या क्षेत्राला तिल्लाई, पेरुप पुलियूर पुंडरीकपुरम्, व्याघ्रपुरम्, चितांबलम् अशी निरनिराळी नावे आहेत. येथे

वर्षातून दोन महोत्सव असतात. त्या वेळी सर्व भारतातून यात्रेकरू व भाविक लोक येत असतात. पहिला महोत्सव जून जुलैमध्ये भरतो, त्याचे नाव 'आनि तिरुंजनम्' दुसरा महोत्सव डिसेंबर–जानेवारीमध्ये भरतो; त्याचे नाव 'अरुद्दर्शन.'

चिदंबरम् या देवालयाचे एकंदर आवार चाळीस एकर जागेवर विस्तारलेले आहे. दोन प्रख्यात मंदिरे व पाच



नटराजमंदिर, चिदंबरम्


प्रमुख सभामंडप या देवालयाच्या प्रांगणात आहेत. पार्वती, सुब्रह्मण्यम्, विष्णू आणि गणेश यांची देवालये आहेत. गणेशमूर्ती प्रचंड आणि भव्य आहे एवढी मूर्ती भारतात दुसरीकडे कोठे क्वचितच आढळेल. या देवालयांची शिल्पकला अत्यंत श्रेष्ठ दर्जाची समजली जाते. दोन

नद्यांच्या मधल्या सपाट प्रदेशावर मंदिराची उभारणी झाली असून जवळपास बांधकामासाठी लागणाऱ्या दगडांचा मागमूसही नाही. तरी पण देवालयातील सहस्रस्तंभी मंडप. प्रवेशद्वार, जलाशय, तलाव आणि असंख्य पायऱ्या या पक्क्या दगडी बांधणीच्या असून हे प्रचंड अवाढव्य काम पूर्ण करण्यास किती कालावधी आणि किती खर्च लागला असेल ? सामग्री कोठून आणली असेल ? ते काम करणाऱ्या लोकांची श्रद्धा किती दृढ असेल याची कल्पनाच केलेली बरी.

प्रमुख देवालयात शिवाची नटराज मूर्ती नृत्य करीत असलेल्या अवस्थेत दृष्टीस पडते. मूर्तीच्या मागे पडद्या आड वायुलिंग आहे. हेच आकाश तत्त्वाचे प्रतीक. ते दिसून येत नाही. चिदंबरम् देवालयाचे वैशिष्टच तर हेच. इतर देवालयांत शिवलिंग दिसते, तसे या देवालयात दिसत नाही. प्रत्यक्षात हे आकाशलिंग अस्तित्वात नसून ते कल्पिलेले आहे. अगदी क्वचित् प्रसंगी किंवा महोत्सव असेल त्या वेळी हा पडदा बाजूला केला जातो. मागच्या पोकळीतून आकाश स्वरूपातून अदृश्य शिवलिंग नटराजच्या स्वरूपात प्रगट झाले व नृत्य करू लागले अशी पौराणिक कथा आहे. त्यासंबंधांची कथा अशी :

व्याघ्रपाद हा महान शिवभक्त. तो शिवपूजेसाठी फुले गोळा करण्याकरिता इतस्ततः भटके. त्यामुळे त्याचे पाय अगदी दमून जात. मानवी पायात अशी शक्ती तरी कितीशी असणार ? मग शिवाने प्रसन्न होऊन त्याला वाघाचे पाय दिले. उद्देश हा की आता तो फुले गोळा

करण्यासाठी कोठेही आणि कितीही भटकला तरी तो दमून जाऊ नये आणि त्याला मनसोक्त फुले गोळा करता यावीत.



नृत्यसभा आणि तिचे सुवर्ण शिखर, चिदंबरम्

पतंजली हा तर आदिशेषाचा अवतार. हे दोन्ही ऋषी लोकांना समजावून सांगण्याकरिता धार्मिक गोष्टींची चर्चा करीत, वाद घालीत. दोघेही महान् शिवभक्त, शिवाला

संतुष्ट करून प्रसन्न करण्यासाठी दोघांनी दीर्घ तपश्चर्या सुरू केली. चित्सभेमध्ये ते ध्यानधारणेस बसत, तेथेच प्रगत होऊन त्यांना संतुष्ट करण्यासाठी शिवाने नटराजाचे रूप धारण करून आपले अभिनव सुंदर नृत्य सुरू केले. शिवाच्या या नयनरम्य अनुपमेय प्रसन्न दर्शनाने दोघेही ऋषी तृप्त झाले. स्वत:ला धन्य समजू लागले.

दुसरी एक कथा अशी सांगतात की, पार्वतीला आपल्या नृत्यकलेचा फार अभिमान वाटू लागला. आपल्यासारखे नृत्य कोणालाच जमणार नाही, असा गर्व ती करू लागली. मग तिचे गर्व हरण करण्यासाठी शिवाने नटराजाचे रूप धारण करून आपली नृत्ये करण्यास सुरुवात केली. ती किती अद्भुत, किती विविध प्रकारची ! ही अभूतपूर्व नृत्ये पाहून पार्वतीचे तत्काल गर्वहरण झाले. भरतनाटचम् या महान नृत्यग्रंथात एकशेआठ नृत्यांची वर्णने केलेली आढळतात. ती सर्व नृत्ये नटराजाने या ठिकाणी केली व त्या त्या नृत्याचे प्रगट स्वरूप पुढे कालांतराने शिल्पकारांनी शिल्पकलेने गोपुरावर व मनोऱ्यावर चित्रित केले. अखिल भारतात चिदंबरम् नटराजाचे हे एकच असे देऊळ, की ज्या ठिकाणी शिवाच्या एकशेआठ नृत्यांचे बहुतेक सर्व प्रकार शिल्पकलेत दाखविलेले आढळतात.

या मंदिरात जी प्रचंड पाच सभागृहे आहेत ती चित्सभा, कनक-सभा, नृत्यसभा, देवसभा आणि राजसभा या नावांची आहेत. यांतील चित्सभा ही मुख्य; त्या गाभाऱ्यात नटराजाची अदृश्य मूर्ती आहे. या ठिकाणी नट-


राजाची यथासांग पूजाअर्चा आणि उपचार केले जातात. या मंदिराचे छत सर्व सुवर्णमय आहे. सर्व बाजूंनी सोन्याच्या पत्र्यांनी मढवलेले हे देवालय सूर्यकिरण आणि असंख्य दीप यांच्या प्रकाशात रात्रंदिवस तळपत असते. प्रत्यक्ष कुबेराने आपले सुवर्णभांडार ओतून ते विश्वकर्म्याकडून घडवलेले असावे असे भाविक लोक समजतात.

कनकसभा म्हणजे एक लहान कमान, द्वारमंडप चित्-सभेजवळच आहे. या द्वारमंडपात शिवाला अभिषेक, पूजा, वगैरे धार्मिक कृत्ये केली जातात. हा सर्व द्वारमंडप तांब्याच्या पत्र्यांनी मढविलेला आहे.

नृत्यसभा-मंडपात नृत्ये करणाऱ्या नटराज शिवाची पाषाणमूर्ती आहे; आपली पत्नी महाकालीच्या स्वरूपात नृत्ये करू लागली; तिला गर्व झाला; तो तिचा गर्व हरण करण्यासाठी या ठिकाणी शिवाने नटराज स्वरूपात एकशे-आठ प्रकारची विविध नृत्ये केली. अशी आख्यायिका आहे. या सभामंडपाभोवती सुंदर व नक्षीदार शिल्पकला कोरलेले दगडी स्तंभ आहेत, नृत्यसभामंडपाभोवती सर्व सोन्याचा पत्रा वेष्टिलेला असून हा मंडप सदा वैभवाने प्रकाशत असतो. देवसभा हे मंदिर असून आतल्या गर्भा-गारासमीप आहे; या सभामंडपात धार्मिक विधी आणि उपचार केले जातात.

शिवराजतलावाचे बाजूस राजसभा हा प्रचंड सहस्र दगडी खांबांचा प्रचंड मंडप आहे. त्याचे क्षेत्र ३४०×१९० फूट आहे. एवढा प्रशस्त आणि भव्य मंडप पाहून मन थक्क होते. याच मंडपात नटराजाची प्रचंड मूर्ती उत्सव-

प्रसंगी शृंगारण्यात येते व त्यावर अभिषेक, महापूजा वगैरे धार्मिक विधी केले जातात.



सहस्रस्तंभी सभागृह, चिदंबरम्

देवालयाच्या प्रशस्त आवारात चारी बाजूंना एक एक प्रचंड गोपुर आहे. उत्तर व दक्षिण दिशेच्या गोपुरांची उंची एकशेसाठ फूट आहे. त्यावर सुवर्णकळस आहेत. ते पुष्कळ अंतरावरूनही अतिशय तळपत असलेले दृष्टीस पडतात. हीच चार प्रवेशद्वारे. दक्षिणेकडील बहुतेक सर्व मंदिरांच्या प्रवेशद्वारी अशीच प्रचंड गोपुरे आढळतात तशीच चिदंबर देवालयाच्या आवारात आहेत. या गोपुरा-


वरील शिल्पकाम अत्यंत सुंदर, सुबक, मनोहारी असून त्यात पुराणातील प्रसंगांची विविध चित्रे, शिवाच्या नृत्यांचे प्रकार चित्रित केले आहेत.

दर चौसष्ट वर्षांनी महापर्वणी काळ येतो. त्या पर्वकाळी चिदंबर देवालयातील नटराज मूर्तीस महाकुंभाभिषेक करण्यात येतो. शिवगंगा तीर्थाच्या बाजूला ही प्रचंड शिवाची मूर्ती अवभृथ स्नानासाठी आणण्यात येते. शिवगंगा तीर्थाचे पाणी स्फटिकासारखे स्वच्छ असून आवार १७५ × १०० असून भोवती दगडी कठडा व उतरण्यास सर्वत्र पायऱ्या आहेत. १९५५ च्या जुलै महिन्यांत हा समारंभ चिदंबरम् येथे मोठ्या थाटाने करण्यात आला. या प्रसंगी लाखो रुपये वर्गणी गोळा करून मंदिराचा जीर्णोद्धार, रंगरंगोटी, सुधारणा करण्यात आली. या प्रसंगी भाविक यात्रेकरू प्रचंड संख्येने नटराजाचे दर्शन घेण्यासाठी जमा झाले होते.

सुवर्णमंडप बांधला गेला, त्याची पौराणिक कथा अशी सांगतात : वीर चोल रायर याने एके दिवशी चिदंबरम्चे सभापती भगवान शिव, पार्वतीसमवेत हातात डमरू घेऊन नृत्य करीत आहेत असे दृश्य पाहिले. या अभिनव अनुभूतीच्या स्मरणार्थ त्याने सुवर्णसभामंडप बांधविला. गोपुरे आणि इतर मंडप त्याचा नातू अरिवारी देव याने इ. स. ९८५ च्या सुमारास बांधून मंदिराचे काम पूर्ण केले. द्रावीडियन कलेचा उत्कृष्ट नमुना या ठिकाणी दृष्टीस पडतो.

या ठिकाणी जे शिलालेख सापडले त्यांवरून चोल घराण्यातील राजा परंतक पहिला (९०७–९५३) याने


नटराजमंदिरास सुवर्णाचे छत तयार करून अर्पण केले. गोपुरांची व सभामंडपांची उभारणी एकाच काळी झालेली



चिदंबरम् येथील शिवमंदिराचे आतील गोपुर आणि तलाव.

नाही. सहस्रस्तंभमंडप इ. स. १५९५ ते १६८५ च्या दरम्यान बांधला असावा.

प्रमुख नटराजमंदिराच्या आवारातच विष्णू, गणपती, पार्वती आणि सुब्रह्मण्यम् ही मंदिरे आहेत. पार्वती व सुब्रह्मण्यम् देवालयांच्या कळसाभोवती त्यांच्या त्यांच्या



सुब्रह्मण्यम् मंदिरावर कोरलेली शिवपार्वतीची मूर्ती, चिदंबरम्

आयुष्यातील अनेक प्रसंगांची चित्रे कोरलेली आहेत. नृत्य प्रकाराची चित्रे अनेक असून त्यातील कलात्मक भाव, विविध प्रकारांनी प्रगट झालेला दिसून येतो. आत, बाहेर, भिंतीवर, छतावर, गोपुरावर नृत्याचे विविध प्रकार रेखाटलेले दिसून येतात. प्रत्येक चित्राच्या खाली नृत्य-प्रकार कोणता त्याचे वर्णन कोरलेले आहे.

हे सर्व विश्व हे नृत्यातील एका लयीप्रमाणे सूत्रबद्ध पद्ध-तीने उभारलेले असे मानण्यात येते. शिव हा नटराज. तो नृत्यात पारंगत. त्याच्या पदाघाताने नृत्ये आविष्कृत झाली.




अकराव्या शतकातील ब्रान्झची नटराज मूर्ती.

चिदंबरम्मधील नटराजाची मूर्ती 'उत्तम दास ताल'

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ........................ विः ..................

या नृत्यप्रकारात घडविलेली आहे. यात चतुर्हस्त, द्विपाद नटराज विराजत असून पुढचा डावा हात दंडस्थ अथवा गजस्थ स्वरूपाचा असून डाव्या हातात अग्नी आहे. उजवा हात हा अभय कर; यावर सर्पवलय आहे. मागच्या उजव्या हातात डमरू आहे. उजवा पाय जरा वाकडा व 'अपस्मार पुरुषाच्या' पाठीवर असून डावा पाय वर उचललेला व उजव्या पायावर अधिष्ठित. मस्तकावर जटामुकुट व त्यावर सर्पांची वेटोळी, फुले, रत्ने, चंद्रकोर आणि कवटचा विभूषित; नृत्य करताना जटा इतस्ततः विखुरलेल्या; गळचात यज्ञोपवीत परिधान केलेले; मुखावर स्मित, छातीवर केशर कस्तुरी यांचा लेप. शिव सर्वांगाने धवळा, भस्मचर्चांकित तनूने विनटलेला. व्याघ्रजिन परिधान केलेला, कटिबंध बांधलेला, उजव्या बाजूस अपस्मार पुरुषाचे मस्तक, काळचाकभिन्न सर्पाशी क्रीडा करीत असलेला. डाव्या बाजूस पार्वती व पुढे भृंगी ऋषी किंवा भद्रकाली. असे हे नटराजाचे स्वरूप. या नृत्यप्रकाराला 'भुजंगत्रास' अशी संज्ञा आहे. नटराजाचे मुखाभोवती प्रभावलय आहे; हे सूर्यप्रभेप्रमाणे तळपणारे. डाव्या उजव्या कानांत सर्पकुंडले, नक्रकुंडले असलेली. या नृत्याचा तात्त्विक अर्थ करतात तो असा– डमरूच्या झंकाराने सृष्टीची उत्पत्ती होते. अभयकराने विश्वाचे पालनपोषण, संगोपन होत असते व अग्नीने विनाश होत असतो. वर उचललेला पाय मुक्त करतो. चौथा हात उचललेल्या पायाकडे निर्देश करतो ती आत्म्याची मुक्तता–निर्वाण ब्रह्मपद. म्हणून चिदंबर हे अखिल विश्वाचे प्रतीक.

सुप्रसिद्ध दक्षिणी संत अप्पार, संबंधर, सुंदरार, मणी-कवचकार यांचे चिदंबर या मंदिराशी संबंध आले. चर्या, क्रिया, योग आणि ज्ञान; किंवा दास, सत्पुत्र, सह आणि सन्मार्ग पंथ यांचे हे प्रवर्तक चिदंबर नटराजाचे महान् उपासक होते.



चिदंबरम् येथील मंदिरातील नंदी.

'पेरियापुराण' या सुप्रसिद्ध पुराणग्रंथात त्रेसष्ट संतांची चरित्रे वर्णिलेली आहेत. त्यात नंदनार आणि तिरुनील कंदनायनार हे महान संत होऊन गेले ते नटराजाचे महान उपासक. नंदनार हा अस्पृश्य असून आपल्या भक्तीच्या जोरावर त्याला नटराजाचे साक्षात दर्शन घडले.

त्याने अग्निप्रवेश केला, पण त्यातून तो शुचिर्भूत ब्राह्मण वेषाने प्रकट झाला व नटराजाचे पदकमली गुप्त झाला, अशी कथा आहे. नटराजभक्तांच्या अशा अनेक कथा सुप्रसिद्ध आहेत. पंढरीचा पांडुरंग जसा महाराष्ट्रात विनटलेला आहे, तसाच भक्तवत्सल नटराज दक्षिणेत चिदंबरम्‌ला विराजमान आहे.

शिव हा दुष्टांचे पारिपत्य करणारा सद्‌गुणी, शीलवान, भक्तांना अभय देणारा. नटराज हे त्याचे एक स्वरूप. भगवान शिवशंकर सदा ध्यानस्थ स्थितीत हिमालयावर तप करीत राहिलेले. भगवान शिव नटराजाचे रूप धारण करतात तो दुष्टांचा संहार आणि भक्तांचे परिपालन करण्यासाठी. म्हणून शिवमहिम्नस्तोत्रात त्याचे वर्णन केले आहे—

महीं पादाघाताद् व्रजति सहसा संशयपदं
पदं विष्णोर्भ्राम्यद् भुजपरिघरुग्णग्रहगणम् ।
मुहुर्द्यौर्दौस्थ्यं यात्यनिभृतजटाताडिततटा
जगद् रक्षायै त्वं नटसि ननु वामैव विभुता ।।

[ तू नृत्य करू लागलास की तुझ्या पदाघाताने ही पृथ्वी डळमळू लागते. तुझ्या प्रचंड बलवान बाहूंच्या आवाक्यात हे सर्व आकाश व त्यातील सूर्य, चंद्र, तारे भीतीने थरथरू लागतात. नृत्य करताना तुझ्या जटेतून विखुरलेले केस सर्व विश्वाला ग्रासून टाकतात आणि तरीदेखील तुझे नृत्य हे सर्व विश्वाच्या संरक्षणासाठी, कल्याणासाठी चाललेले असते ! हे सर्वशक्तिमान सवश्रेष्ठ भगवान शंकरा, तुझी लीला किती अगाध ! किती अद्‌भुत ! किती अनाकलनीय ! ]

# ८ : कोणार्क

" हे सूर्यनारायणा, तू या सर्व भूतलाचा जन्मदाता आहेस. जीवनातला सारा रस तूच आहेस. पशु, पक्षी, मानव, वृक्ष आणि वेली यांचे तेज तूच ! तुझ्यामुळेच ह्यांचे जीवन सुफलित होते. तुझ्या दर्शनाने अंधकाराचा नाश होतो; सर्व पापांचे भस्म होते. रोग, व्याधी आणि अकाल मृत्यू यांचे निवारण होते. हे भगवान, या भक्ताला तू पावन कर. "

कोणार्क हे भगवान सूर्यनारायणाचे क्षेत्र पुरातन कालापासून प्रसिद्ध असून ते ओरिसा प्रांतात जगन्नाथपुरीपासून एकवीस मैलांवर आहे. भुवनेश्वर आणि जगन्नाथपुरीपासून मोटारने कोणार्कला जाता येते. भुवनेश्वरापासून ते चाळीस मैलांवर येते.

भगवान सूर्यनारायण हे भारतीयांचे वेदोक्त आराध्य दैवत आहे. सूर्योदयाच्या वेळचे मंत्रही वेदोक्त असून भावपूर्ण आहेत. त्या मंत्रांत म्हटले आहे : " पूर्वेला उदय पावणारे सूर्यबिंब म्हणजे जगाचा नेत्र. ते तेज परम शुद्ध आहे. देवांना प्रिय आहे. त्याच्या प्रसादाने वाग्-नेत्र-कर्णादी इंद्रियांची कार्यक्षमता उत्तम राखून आम्ही शंभर वर्षे जिवंत राहू. सूर्यनारायणाच्या कृपेने शंभर वर्षांहूनही अधिक काळ आम्हांस संपन्न जीवन लाभो. "


संध्यावंदनात सूर्याची प्रार्थना आहे, त्याचप्रमाणे पंचायतन पूजेतही सूर्यपूजेला स्थान आहे.

कोणार्कमंदिर हे समुद्र किनाऱ्यावर असून देवालयाचा परिसर रेतीने व्यापलेला आहे. सागराच्या लाटांचा आवाज कोणार्क मंदिरापर्यंत पोहोचू शकतो. पूर्वकाळी या भागात चंद्रभागा नदीचा परिसर असून हे देवालय निसर्गरमणीय स्थान म्हणून प्रसिद्ध होते.

कोणार्कमंदिराच्या स्थापनेची पौराणिक कथा श्रीकृष्णपुत्र सांब याच्या जीवनाशी निगडित आहे. सांब हा स्वरूपाने अतिशय सुंदर, तेजस्वी दिसे. नारदमुनींनी त्याला एकदा श्रीकृष्णाच्या स्त्रिया जिथे स्नान करीत होत्या तेथे नेले. त्याला पाहून त्या स्त्रिया मोहवश होऊन त्याच्याशी प्रणयचेष्टा करू लागल्या. ही गोष्ट चालू असता नारदमुनी तिथून श्रीकृष्णाकडे गेले आणि त्याला तिथे घेऊन आले. सांबाचे हे चाळे पाहून श्रीकृष्ण संतापला. त्याने सांबाला शाप दिला, "तुला कुष्ठ रोग होईल." सांबाने या बाबतीत आपण पूर्ण निर्दोषी आहोत, असे सांगून श्रीकृष्णाची समजूत पटवली. श्रीकृष्णाने त्याला मैत्रेयवनात जाऊन सूर्याची आराधना करण्याचा आदेश दिला. सांबाने याप्रमाणे आराधना केल्यावर सूर्य त्याला प्रसन्न झाला. त्याने सांबाला आपल्या एकवीस नावांचा जप करून चंद्रभागा नदीत स्नान करण्याची आज्ञा दिली. स्नान करीत असताना सांबाला नदीच्या पात्रात सूर्याची एक कमलासनमूर्ती सापडली. त्या मूर्तीची सांबाने तिथेच प्रतिष्ठापना केली व तिथे एक मंदिर बांधले. पुढे त्या सूर्य देवतेची

पूजा केल्यामुळे सांब कुष्ठ रोगातून मुक्त झाला.

सांबाने बांधलेल्या सूर्यमंदिराचा आज येथे दिसत असलेल्या मंदिराशी संबंध नाही. तसेच चंद्रभागा नदी आता या भागात वाहत नाही. तरी भाविक लोक अजूनही



सूर्यमंदिर, कोणार्क

कोणार्क येथे जातात. रथसप्तमीच्या दिवशी तिथे स्नान करतात. कारण याच दिवशी सांब रोगमुक्त झाला.

कोणार्कचे सूर्यमंदिर आज भग्नावस्थेत दृष्टीस पडते.


मंदिराचा गाभारा उद्ध्वस्त झालेला असून त्यातील सूर्यनारायणाचीही मूर्ती जागेवर नाही. देवालयाचा सभामंडप (जगमोहन) तेवढा उभा आहे. त्याची उंची एकशेतीस फूट व लांबी शंभर फूट असून तो एका उंच जोत्यावर बांधलेला आहे. वरती कळस नाही. पण कळसापर्यंत निमुळती होत जाणारी ही रचना असून त्यावर अप्सरांच्या मूर्ती अत्यंत रेखीव आणि प्रमाणबद्ध कोरलेल्या आहेत. पूर्वेस नटमंदिर व मंदिराच्या मागे सूर्यपत्नी 'संज्ञा' हिचे मंदिर होते. पण तेही भग्नावस्थेत आहे.

हे सर्व सूर्यमंदिर एका रथावर आरूढ असल्यासारखे दिसते. उत्तर बाजूला बारा, दक्षिण बाजूला बारा अशी चोवीस मोठाली चाके आहेत. पूर्वेला सात घोडे दौडत आहेत असे कल्पिले आहे. भगवान सूर्यनारायणाच्या रथाचे सारथ्य अरुण करीत असला तरी आता त्याची मूर्ती तेथे नाही. सूर्याचा रथ सारखा दौडत आकाशमार्ग आक्रमित



चाक, सूर्यमंदिर कोणार्क,

असतो. त्याचे हे प्रतीक शिल्पाकृतीत उभारलेले आहे. सात घोडे म्हणजे सात वार, चोवीस चाके ही वर्षातील पक्ष, बारा महिने आणि बारा राशी यांतून सूर्याचे भ्रमण दर्शवितात. प्रत्येक चाकाला आठ आरे आहेत ते दिवसातील आठ प्रहरांचे प्रतीक आहे. प्रत्येक चाकावर मनोहर नक्षीकाम केले असून मानवाच्या आणि पशूंच्या छोटचा पण सुरम्य आकृती कोरल्या आहेत.



कोणार्कच्या सूर्यमंदिराजवळचे हत्ती, तेरावे शतक.


पुरातन काळचे कोणार्क सूर्यमंदिर अतिप्रचंड असावे. त्याचे शिखर २२७ फूट उंच होते. कळस ५६ मणाच्या एका अखंड शिळेचा बनवलेला होता असे म्हणतात. तेथील एका शिळेवर नवग्रहांचे अप्रतिम शिल्प आहे. या शिल्पातील सूर्यमूर्ती तेवढी काढून नेली आहे.

मंदिराच्या विस्तीर्ण प्रांगणाभोवती एक उंच तट असून त्याला तीन दिशांना तीन महाद्वारे आहेत. त्यांपैकील पूर्वेकडच्या महाद्वारावर दोन बाजूंना विक्राळ सिंह दोन हत्तींवर झेप घेताना दिसतात. उत्तरेकडील महाद्वाराजवळ दोन प्रचंड हत्ती उभे दिसतात. दक्षिण महाद्वाराजवळ दोन महाप्रचंड अश्व उडी घेताना दिसतात. या सर्व शिल्पाकृतीतील भव्यता, प्रमाणबद्धता, उठावदारपणा आणि त्यावरील रेखीव कलाकुसर पाहून मन आश्चर्यचकित होते.

मंदिराच्या सभामंडपावर विविध प्रकारची चित्रे कोरलेली आहेत. त्यात मानवी जीवनातील विविध अंगांचे चित्रण, राजदरबाराचे दृश्य, चतुरंग सैन्याची धामधूम दृष्टीस पडते. कुठे योगसाधना करणारे ऋषी, तर कुठे भक्त पूजेत मग्न, कुठे शिष्यांना गुरू पाठ देत आहेत, कुठे प्रेमी युगुलांचे मीलन, तर कुठे मृगयेचा देखावा दृष्टीस पडतो. पशुपक्षी, वृक्षवेली, फळेफुले, अप्सरांची नृत्ये, रामायण-महाभारतातील दृश्ये मनोहारी आहेत. त्यांवरून ओरिसाची मूर्तिकला आणि स्थापत्यकला परिपूर्णतेला पोचलेली, अत्यंत सजीव, उठावदार, चैतन्यपूर्ण होती असे प्रत्ययास येते. हे भोगमंदिर नसून नाट्यमंदिर असावे असे दिसते.

कोणार्कमंदिर गंग वंशातील राजा नरसिंहदेव याने इ. स. १२७८ साली बांधले. त्यासाठी त्याला छत्तीस कोट रुपये खर्च आला. बाराशे कारागीर सतत सोळा वर्षे हे मंदिराचे शिल्प घडवीत होते असे म्हणतात. मंदिराचें

बांधकाम जवळ जवळ पूर्ण होत आले होते त्या वेळची एक कथा प्रसिद्ध आहे :



कोणार्कच्या सूर्यमंदिराजवळचा अश्व, तेरावे शतक.

गर्भगृहावर कलश चढविण्याचे तेवढे काम पूर्ण व्हावयाचे राहिले होते. हे काम अत्यंत कठीण होते. कारण कलश तयार केलेली शिला प्रचंड व जड होती. ती अलगद इतक्या उंचावर नेऊन कशी ठेवणार, हा मोठा बिकट प्रश्न होता. मुख्य शिल्पकार विसू महाराणा याची मती गुंग झाली होती. इतके कामगार आणि शिल्पशास्त्रज्ञ होते पण कोणासही उपाय सापडेना. इतक्यात मंदिराच्या आवारात एक बारा वर्षांचा गरीब मुलगा "बोरे घेता का बोरे?" म्हणून बोरे विकण्यास आला. बोरे विलक्षण चवदार होती. विसू महाराण्यानेही एक बोर चाखले. त्याची रुची इतकी

मधुर होती की अशी बोरे इकडच्या प्रांतात कोठेही मिळणे अशक्य होते. विसू महाराणा याच्या घरीच एक बोरीचे झाड होते. त्याची बोरे अशीच चवदार व मधुर होती. त्याची आठवण त्याला झाली. हा बोरे विकणारा मुलगा कोण ? म्हणून विसूराणा मुलाजवळ येता तो तर मुलगा त्यांच्या तोंडाकडे बघू लागला. नजरेस नजर भिडताच बापापेक्षा मुलाने पहिल्याने ओळखले आणि त्याने " बाबा " म्हणून वात्सल्याने हाक मारून त्याच्या पायांना मिठी मारली. " तू माझा बाळ धर्मपाल काय ? हो. अरे तूच. " पितृ-वात्सल्य उचंबळून आले व विसूराण्याने मुलाला छातीशी कवटाळले.

बारा वर्षांपूर्वी विसू राण्याने आपले गाव सोडले होते. राजाज्ञेप्रमाणे कोणार्कमंदिराच्या स्थापत्य शिल्पाचे प्रमुख म्हणून त्यांची नेमणूक झाली. त्याने घर सोडले त्या वेळी त्याला एक मुलगा झाला होता. त्याचे नाव त्यांनी धर्मपाल असे ठेवले होते. गोणार्क येथे आल्यावर मंदि-राच्या कामात विसूराणा इतका गढून गेला होता की त्याला घरची आणि मुलाची आठवणच होत नसे. बारा वर्षे लोटली. इकडे त्याची पत्नी डोळ्यांत प्राण आणून त्यांची मार्गप्रतीक्षा करीत होती. धर्मपालही आपल्या पित्याच्या शोधार्थ बाहेर पडला. आपला पिता दृष्टीस पडल्यास त्याला उपहार म्हणून घरच्या झाडाची बोरे द्यावी, या उद्देशाने तो शेकडो मैल चालत चालत कोणार्क मंदिराचे काम चालले होते तेथे येऊन ठेपला.

धर्मपाल म्हणाला, " बाबा, तुम्ही घरी कधी येणार ?

आई तुमची किती व्याकुळतेने वाट पाहत आहे ! ओळख पटावी म्हणून तिनेच ही बोरे दिली. तिने तुम्हांला निरोप पाठविला आहे की तुम्ही घरी येईपर्यंत मी म्हातारी होणार काय ?"

पित्याचे हृदय पिळवटून निघाले. पण मान खाली घालून तो मुलाला म्हणाला, " बाळ, मला येथून निघता येत नाही. मंदिराचे काम पूर्ण होईपर्यंत कोणीही येथून जायचे नाही, अशी राजाज्ञा आहे. मंदिराचे कामही पूर्ण होत आले आहे. फक्त कळस चढविण्याचे काम बाकी राहिले आहे. पण हेच काम काही केल्या पूर्ण होत नाही. "

धर्मपाल म्हणाला, " इतकेच ना ? काम एक दोन दिवसांत पूर्ण होईल. मग याल ना माझ्याबरोबर घरी ?"

पिता म्हणाला, " ईश्वर जाणे ? कदाचित पुरे होईल. कदाचित होणार नाही आणि हे काम जर पूर्ण झाले नाही तर जगात तोंडच दाखवायला नको ! अपेशी म्हणून कदाचित आम्हांला राजाज्ञेने ठार मारले जाईल. "

मग धर्मपाल तेथे थांबला नाही. काम चालू होते तेथे तो गेला. मंदिराची सर्व रचना त्याने समजून घेतली. घडविलेला कलश पाहिला. कलशाची उंची, वजन, याचा अदमास घेतला. मग त्याला युक्ती सुचली. त्याने एक प्रयोग करण्याचे ठरविले व तो यशस्वी होईल असे वाटताच तो आनंदातिरेकाने ओरडून म्हणाला, " बाबा, आज रात्री कळस मंदिरावर उभारला जाईल. "

दुसऱ्या दिवशी पाहतात तो कळस मंदिरावर विराजमान होऊन तळपत असलेला ! मंदिराचे काम संपूर्ण झाले !

पण मंदिराचा कळस चढविण्याचे काम एका साध्या अजाण मुलाने केले, असे राजास समजले तर आपल्या पित्याची मानखंडना होईल. आपल्या पित्याचा मान राखणे आपले कर्तव्य आहे, असे ओळखून धर्मपालाने शिखरावरून नदीत उडी टाकून आपले बलिदान केले ! ही एक दंतकथा असली तरी त्यात केवढ्या उदात्त प्रेमाच्या, वात्सल्याच्या आणि त्यागाच्या कल्पना आहेत हे पाहून मन भरून येते.

या सूर्यमंदिरातील सूर्यमूर्ती भव्य होती. नाक, कपाळ, गाल, सर्व अगदी रेखीव. छाती उन्नत होती; हातावर कमल, छातीवर रुळणाऱ्या माला, कानांत कुंडले, कमरेवर मेखला, विकसित कमलाप्रमाणे, हसरे, शांत आणि प्रसन्न मुखकमल आणि डोक्यावर रत्नखचित मुकुट. पण ही सूर्यमूर्ती मंदिरात आहे कोठे ! आता गर्भागारात सूर्यमूर्ती दृष्टीस पडत नाही. ती भग्न झाली. पंडित जवाहरलाल नेहरूंच्या सूचनेवरून १९५० साली येथील भग्न सूर्यमूर्ती दिल्लीच्या राष्ट्रीय संग्रहालयात नेण्यांत आली. मंदिराचे भाग कसे उद्ध्वस्त झाले यासंबंधी अनेक कथा आहेत. 'काला पहाड' या जुलमी मुसलमान सेनापतीने मंदिराचे शिखर फोडले, कळस काढून नेला आणि मंदिर उद्ध्वस्त केले ! विध्वंसनाची सर्व कथा अत्यंत करुणास्पद आहे. आज भग्नावस्थेत दिसणारे सूर्यमंदिरही मध्यंतरीच्या कित्येक वर्षांच्या काळात अज्ञातवासात होते. १९०३ सालच्या सुमारास बंगालच्या गव्हर्नराच्या खटपटीने भारतीय स्थापत्य कलेचा हा उत्कृष्ट नमुना अज्ञातवासातून बाहेर आला. कोसळणाऱ्या जगमोहन मंडपाच्या

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम २१३५३ दि: २५-... ९९
क्रमांक ३८१ नों. दि: २५/२/८८



आत त्यांच्याच खटपटीने दगडमातीचा भराव घालण्यात आला आणि मंदिराचा काहीसा भाग कायम राखता आला. रथाच्या सात घोड्यांपैकी एक पूर्णपणे शाबूद आहे. आणि इतरांचे अवशेष आहेत. रथाच्या चोवीस चाकांपैकी सात आठ चाके अद्यापि मोडतोड न होता राहिली आहेत. आजच्या भग्न स्वरूपावरूनही मूळचे संपूर्ण अवस्थेतील स्वरूप डोळ्यांपुढे कल्पनेने आणता येते. इसवी सनाच्या तेराव्या शतकातील ही शिल्पकला पाहून भारतातील कलाकार किती भक्तीने आणि



ती सूर्यमूर्ती अशीच असेल काय ?

दैवी भावनेने वर्षानुवर्षे काम करीत असत याचे प्रत्यंतर येते. या शिल्पाकृतीत ठायी ठायी रेखीवपणा, प्रमाणबद्धता, विविधता, कलात्मकता, सौष्ठव आणि पाषाणातून सजीव आकृती हुबेहूब निर्माण करण्याचे रचनाकौशल्य दृष्टीस पडते. मंदिरावर ठिकठिकाणी प्रेमी युगुलांच्या प्रणयक्रीडांची चित्रे कोरलेली आढळतात त्यांवरून कलावंतांवर वामचारी उपासनांचा मोठा पगडा असावा असे वाटते. यासंबंधी कविवर्य श्री. रवींद्रनाथ ठाकूर म्हणतात, " जग कसे चालले आहे हे दर्शविण्याकरिता या कलाकृती खोदल्या असाव्या. " कोणी म्हणतात, ओरिसात तंत्रमार्गाचा प्रभाव होता. या पंथाचा उपासनात्मक भोगवाद कोणार्कच्या मंदिरातील शृंगारिक शिल्पात प्रगट झाला असावा. दुसरी कल्पना अशी आहे की, यात्रेकरूंनी ही चित्रे पाहून आपल्या अंत:करणातील भोगविषयक वासनेपासून विरक्त व्हावे आणि शुद्ध मनाने मंदिरात प्रवेश करावा या हेतूने ही चित्रे कोरली आहेत.

दर्यावर्दी लोक या मंदिराला ' काळा पगोडा ' म्हणतात. या मंदिराच्या शिखरावर एक विलक्षण शक्तीचा पाषाण होता. त्याच्या अंगी प्रबळ आकर्षक शक्ती होती. त्यामुळे सागर किनाऱ्यावरील जहाजे ओढली जात. पुढे जाण्यास त्यांना अडथळा होई. पुढे काही दर्यावर्दी खलाशांनी तो पाषाण तेथून काढला. त्यानंतर मंदिर कोसळले. अशी आहे. ही कोणार्कच्या सूर्यमंदिराची कथा.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १५८९

# १ : कामाख्या

कामदा कामिनी कामा कान्ता कामाङ्गदायिनी ।
कामाङ्गनाशिनी तस्मात् कामाख्या तेन चोच्यते ।।

(शिवाची ही सर्वांगसुंदर पत्नी, भुक्ति आणि मुक्ति दोन्ही प्रदान करणारी, सर्व कामना पूर्ण करणारी म्हणून या देवतेचे नाव कामाख्या.)

आसाममधील गौहाटीपासून पाच किलोमीटर अंतरावर कामाख्येचे सुप्रसिद्ध मंदिर आहे. ज्या पर्वतटेकडीवर हे मंदिर आहे त्याचे नाव नीलाचल (निळा डोंगर). कालिकापुराणात हे आद्य शक्तिपीठ म्हणून वर्णिलेले आहे. याची कथा अशी : सती ही शिवाची पत्नी, आपला पिता दक्ष याने यज्ञ आरंभिला त्या वेळी ती तेथे गेली. पण तिचा अपमान झाला. आपला पती शिव याला आमंत्रण नाही. त्याचा अनादर झाला हे पाहून तिने प्राणत्याग केला. शिवाला हे समजताच त्याला अतिशय दुःख झाले. त्या भरात त्याने सतीचा पार्थिव देह खांद्यावर घेऊन तांडवनृत्य करण्यास सुरुवात केली व तो इतस्ततः संचार करू लागला. पृथ्वी कंपायमान झाली. सर्व मानवप्राणी घाबरून पळत सुटले. देवादिकही घाबरले आणि विष्णूकडे मदतीची

याचना करू लागले. शिवाला शांत करावयाचे तर त्याच्या खांद्यावरून सतीचा देह हलविणे आवश्यक होते. विष्णूने आपल्या सुदर्शन चक्राने त्या शवाचे एक्कावन्न तुकडे केले आणि ते सर्व भारतात ठिकठिकाणी विखुरले गेले. ज्या ठिकाणी हे तुकडे पडले, ती सर्व आदिमातेची शक्ति-पीठे बनली. सर्वांत महत्त्वाचे स्थान नीलाचल होते म्हणून हे आद्यपीठ. कामगिरी ही देवीला अत्यंत प्रिय टेकडी म्हणून या ठिकाणच्या स्थानाला 'कामाख्या'– सर्वांचे मनोरथ पूर्ण करणारी–असे नाव प्राप्त झाले.

सतीच्या शरीराचा भाग येथे पडल्याने आणि शंकराचे वास्तव्य येथे झाल्याने हा पर्वत निळा झाला. आपल्या पतीची इच्छा तृप्त करण्यासाठी देवी या ठिकाणी गुप्तपणे येते म्हणून तिचे नाव कामाख्या. सतीची पुण्यभूमी म्हणून या ठिकाणाला महान पावित्र्य उत्पन्न झाले. भुक्ती व मुक्ती दोन्ही देणारी ही अत्यंत श्रेष्ठ देवता आहे, असे तिचे वर्णन कालिकापुराणात केले आहे.

आसाम प्रांताचा प्राचीन इतिहास कामाख्या देवीच्या निरनिराळ्या शतकांतील कथांशी निगडित आहे. या देवीसंबंधी पौराणिक कथा अनेक असून त्या कालानुसार बदललेल्या आढळतात. आसाम आणि बंगाल या दोन प्रांतांतून या देवीच्या दर्शनासाठी असंख्य यात्रेकरू दरसाल येत असतात. भारताच्या इतर प्रांतांतून काही यात्रेकरू येतात.

कामाख्या देवीच्या मंदिराचे एक वैशिष्टय आहे. ते म्हणजे मंदिरात देवीची मूर्ती नाही. देवालयाच्या गर्भा-

गारात एक गुहा आहे. या गुहेतून सतत झिरपणारा एक जिवंत झरा आहे; त्या पाण्यामुळे कोपऱ्यात ठेवलेला देवीच्या शरीराचा एक भाग नेहमी जलाशयाने परिवेष्टित असतो. या जागेवरच देवीची पूजाअर्चा होते. काली देवीप्रमाणेच हिची पूजाअर्चा आहे. देवीपुढे बळी देण्यात येतो; देवीच्या नावाने कुमारिकांना भोजन घालतात.

कामरूप हे नाव या भागाला मिळाले त्याची कथा अशी : आपल्या तपात विघ्न उत्पन्न केल्याबद्दल भगवान शंकराने आपल्या तृतीय नेत्राने कामाला दग्ध केले. पण उःशाप म्हणून या ठिकाणी पुनः त्याला सुंदर रूप प्राप्त झाले.

कालिका पुराणात योगिनी तंत्राची एक निराळीच अद्‌भुत कथा आहे. देवीच्या तीन प्रवृत्तींमुळे तिची तीन निरनिराळी स्वरूपे दृष्टीस पडतात. जेव्हा ती काममोहित असते, तेव्हा तिचे स्वरूप सुंदर, कमलावर अधिष्ठित, पिवळा हार हाती घेतलेले, प्रणयिनीसारखे मोहक दिसते. ती क्रोधाविष्ट झाली म्हणजे तिचे स्वरूप उग्र होते. त्या वेळी तिच्या हातात तलवार असते. ती तलवार उगारून एका प्रेतावर पाय ठेवून उभी असते. ती जेव्हा प्रेमळ, कृपा दर्शविणारी, करुणामय कामदा असते, तेव्हा ती सिंहावर आरूढ असते. तिला काय ! मनात येईल तेव्हा, जसे हवे तसे रूप घेता येते ! म्हणून तिला कामरूपिणी म्हणतात.

आसाम प्रांतात नरकासुराने शक्त्युपासना प्रथम आणली, अशी महाभारतात कथा आहे. नरकासुर हा देवीचा मोठा भक्त होता. त्याने देवीला प्रसन्न करून घेऊन स्वतःला

राज्य, भोग, विलास मिळविले. पुढे तो उन्मत्त झाला. प्रत्यक्ष देवीविषयी त्याने अभिलाषा धरली! ही त्याची अवनती आणि भ्रष्टता पाहून वसिष्ठ मुनी संतप्त झाले; "नरकासुराने बांधलेले कामाख्यापीठ आजपासून गुप्त होईल," असा त्यांनी शाप दिला. त्याप्रमाणे हे पीठ अनेक शतकेपर्यन्त भूमीत गुप्त झाले. युगानुयुगे लोटली. कामाख्यापीठाचा मागमूसही उरला नाही. ही वस्तुस्थिती इसवी सनाच्या सोळाव्या शतकापर्यंत तशीच होती.

पुढे या कामरूप देशात विश्वसिंह राजा राज्य करू लागला. एका प्रसंगी तो डोंगरावर संचार करीत असता दमून भागून विश्रांतीसाठी एका वृक्षाच्या छायेखाली बसला. त्याला फार तहान लागली. पण तेथे पाणी कुठे सापडणार आणि कोण आणून देणार? या विवंचनेत तो सापडला असता तेथे एक म्हातारी आली. तिच्या हाती पूजासाहित्य होते. ती कोणाची तरी पूजा करण्यासाठी निघाली होती. वृक्षाखाली दमून भागून बसलेला तो राजपुरुष पाहून तिने त्याची चौकशी केली. तो तहानलेला आहे असे कळताच तिने प्रथम त्याला पाणी आणून दिले. भुकेल्याला अन्न आणि तहानेल्याला पाणी देणे ही परमेश्वराची पूजा आहे. म्हातारीला धन्यवाद देऊन राजाने विचारले, "तू येथे कशासाठी एवढी दगदग करून आलीस?"

म्हातारी म्हणाली, "राजा, ज्या वृक्षाच्या छायेखाली तू बसला आहेस त्या वृक्षाखाली एक मातीचा उंचवटा आहे. ह्या मातीच्या प्रचंड ढिगाऱ्याखाली देवीची पीठिका आहे. हे तिचे स्थान जागृत आहे, असे असल्यामुळे या

ठिकाणच्या पंचक्रोशीतील लोक येथे येऊन देवीची अनन्य भावे पूजा करतात. ही देवी कोणती, ती येथे कशी आली, तिचे स्वरूप काय हे त्यांना कधीही पाहायला मिळाले नाही; पण ही नवसाला पावते. ती क्रुद्ध झाली तर संकट ओढवते, अकाली दुष्काळ पडतो, उपासमार होते, लोक अन्नान्न करून मृत्युमुखी पडतात. म्हणून या देवीची कृपा संपादन करून घेऊन तिचा आशीर्वाद घ्यायचा. मीही त्याच उद्देशाने येथे सालोसाल येत असते. तिच्या कृपेनेच मी आतापर्यंत जगले वाचले."

म्हातारीचे हे भक्तिपूर्ण बोलणे राजाने लक्षपूर्वक ऐकले. आपले राज्य वाढावे आणि प्रजा सुखी व्हावी यासाठी देवी प्रसन्न व्हावी असे त्याला वाटले. तो उठला. त्या अंतर्गत असलेल्या देवीला नम्र भावे अभिवादन करून त्याने प्रार्थना केली, "देवी, जगदंबे, तुझे नाव काय ? तुझे स्वरूप काय ? हे आम्हा मानवांना अवगत नाही. मी तुला अनन्य भावे शरण आलो आहे. मला युद्धात जय मिळो. मी विजयी झालो व माझे साम्राज्य वाढले तर या ठिकाणी मी तुझे सुवर्णमंदिर बांधीन."

विश्वसिंहाची ही मनीषा पूर्ण झाली. त्याला युद्धात जय मिळाला, तो विस्तृत प्रदेशाचा राजा झाला, त्याची प्रजा सुखी झाली. हे सर्व घडले ते देवीच्या कृपेने, असे ओळखून राजाने ह्या ठिकाणी उत्खनन करून मूळ देवीचे स्थान शोधून काढले.

नीळकूट पर्वतावरील वटवृक्ष आणि झाडी तोडून. त्याने ती जागा साफसूफ केली. त्या ठिकाणी त्याने मंदिराचा पाया

घातला. ‘देवीचे मंदिर हे सुवर्णाचे बांधीन’, असा नवस तो बोलला होता, पण हे सर्वस्वी शक्य नव्हते. पर्याय म्हणून मग त्याने प्रत्येक विटेत एक रती सोने घातले व मंदिराची उभारणी केली. अशा रीतीने त्याने मंदिर उभारले आणि आपला नवस पुरा केला.

अनेक शतके लोटल्यानंतर पुनः नीळकूट पर्वतावर कामाख्या देवीचे मंदिर झळकू लागले. मंदिराचा सुवर्ण कळस सूर्यकिरणांनी तळपू लागला. तो अनेक मैल अंतरावरूनही दिसे. कामरूप देशातील जनता मंदिरातील देवीचे दर्शन घेऊ लागली, पूजाअर्चा करून देवीची सेवा करून कृतार्थ होऊ लागली. कामाख्यापीठ पुनः पूर्व वैभवाने तळपू लागले.

विश्वसिंहाच्या मृत्यूनंतर त्याचा पुत्र मल्लदेव गादीवर आला. त्या वेळी त्याच्या राज्यात ‘काला पहाड’ या नावाने बंगालमध्ये प्रसिद्ध असलेला एक बंडखोर वावरत होता. त्याची वक्रदृष्टी या मंदिराकडे वळली. एक दिवस धाड घालून त्याने मंदिर उद्ध्वस्त केले; आणि सर्व चीजवस्तू लुटून नेली. मल्लदेवाला फार वाईट वाटले. पण पुनः प्रयत्न करून इ. स. १५६२ मध्ये त्याने देवीचे मंदिर पूर्ववत बांधले. मल्लदेव व त्याचा बंधू चिल्लराय यांच्या मूर्ती आजही कामाख्यामंदिरात देवीच्या मूर्तीपुढे उभ्या असलेल्या दृष्टीस पडतात. पण पुढे दुर्दैवी घटना घडली. त्यामुळे राजा मल्लदेव व त्याच्या घराण्याचे सर्वच स्वरूप बदलून गेले. ती कथा अशी :

आपल्या पित्याप्रमाणे राजा मल्लदेव हा देवीचा

अनन्य भक्त होता. देवीची षोडशोपचारे पूजाअर्चा, उत्सव, मिरवणूक हे सर्व कार्यक्रम दरसाल विधियुक्त घडतील, अशी व्यवस्था त्याने केली. राजाने केन्दुकलाई नावाच्या एका ब्राह्मणाला देवीचा पुजारी म्हणून नेमले होते. तो पुजारी मनोभावे देवीची त्रिकाळ पूजा करी. त्याचा भक्तिभाव पाहून आरतीच्या वेळी सायंकाळी देवी प्रगट होऊ लागली. पुजाऱ्याच्या आरतीच्या व घंटेच्या सुरावर ती मूर्तीतून बाहेर पडून तालावर नृत्य करू लागे. ब्राह्मणाला हे दृश्य पाहून धन्य वाटे. त्याच्या डोळ्यांचे पारणे फिटे. "तुला मी दर्शन देते, तुझ्या आरतीच्या वेळी मी प्रगट होऊन नृत्य करू लागते, ही गोष्ट मात्र कोणासही कळता कामा नये. ही बातमी गुप्त राहिली पाहिजे," असे तिने पुजाऱ्याला निक्षून बजावले. असे कित्येक दिवस निघून गेले. पण पुढे कसे झाले, कोण जाणे? पुजाऱ्याला देवीचे साक्षात दर्शन घडते. ती रोज आरतीच्या वेळी प्रगट होते ही वार्ता षट्कर्णी झाली. आणि अखेर राजाच्या कानांवर गेली. मल्लदेव आश्चर्याने स्तिमित झाला. त्याने पुजाऱ्याला बोलावून या गोष्टीची सत्यता विचारली. पुजाऱ्याने घाबरत, पण सर्व हकीगत निवेदन केली. मल्लदेव म्हणाला, "गुरुजी, तर मग आम्ही आरतीच्या वेळी येऊन समक्षच त्याची प्रचीती घेणार. हे देवीचे अनुपमेय सुंदर स्वरूप व नृत्य मी समक्ष पाहणार!"

पुजाऱ्याचे धाबे दणाणले. मग धाडस करून तो म्हणाला, "महाराज, कृपया हे साहस आपण करू नये, देवीची तशी आज्ञा नाही. ह्या वेळी मला तुझ्याशिवाय कोणीही


पाहता कामा नये, अशी सक्त ताकीद तिने मला दिली आहे; तरी क्षमा असावी."

हे ऐकून राजाला आपला अपमान झाला असे वाटले. तो मनात म्हणाला, "देवीचे मंदिर मी बांधले. देवीच्या षोडशोपचार पूजेची व्यवस्था मी केली. देवीचे वैभव मी वाढविले. मग यःकश्चित पुजाऱ्याला होणारे दर्शन मला का घडू नये? पुजारी मला 'नाही' म्हणणारा कोण? तो खोटे कशावरून सांगत नसेल? छे:! आपण हे सहन करणार नाही. मी देवीचे दर्शन घेणार."

बिचारा पुजारी! देवीचा कोप आणि राजाची अवकृपा. इकडे आड, तिकडे विहीर अशी त्याची अवस्था झाली! शेवटी त्याने हात जोडून राजाला नम्र विनंती केली, "आपण मंदिरात येऊ नये. बाहेरून मंदिराच्या गवाक्षातून जेवढे दिसेल तेवढेच पाहावे व त्यात समाधान मानावे!" ही अट शेवटी राजाने मान्य केली.

त्याच दिवशी सायंकाळच्या आरतीच्या वेळी नीलकंठ पर्वतावरील कामाख्या मंदिरात राजा आला व प्राकाराच्या गवाक्षात जाऊन हळूच उभा राहिला. एक डोळा बारीक करून छिद्रातूनत्याला देवी दिसू लागली. पूजा यथासांग झाल्यावर आरती सुरू झाली. पुजाऱ्याच्या गळ्यातून आरतीचे ते श्रवणमधुर शब्द ऐकताच रोजच्याप्रमाणे देवी साक्षात् प्रकट होऊन बाहेर निघाली! अप्रतिम, सुंदर, प्रसन्न, सुहास्यवदन असलेल्या देवीची नृत्याची सिद्धता झाली. तिच्या सर्वच देहलतेवर विद्युल्लतेची चमक व कोटि चंद्रांचे अनुपम तेज विलसत होते! तिची पदनूपुरे

रुणझुणत होती. तिचा पदन्यास सुरू झाला. लय लागला व ती नृत्यात गढून गेली. पुजाऱ्याचे डोळे दिपून नेले. हे सर्व चालू असताना देवीने चौफेर नजर फिरविली. तो



कामाख्यामंदिर.

गवाक्षातून कोणी तरी निरखून पाहत आहे, असे तिला वाटले. हा पुजाऱ्याचा गुन्हा आहे, त्याने गौप्यस्फोट केला असला पाहिजे.

झाले. देवी क्रुद्ध झाली. तिचे निरुपम, कोमल, मनोरम, सुंदर स्वरूप पालटले. ती कालिमातेसारखी रौद्र दिसू लागली. तिने पदर बांधला, केशपाश घट्ट केला. डोळे विस्फारले. तिची आकृती महाभयंकर दिसू लागली. तिच्या नयनांतून अंगार निघू लागले. एकाच दृष्टिक्षेपात तिने पुजाऱ्याचे मस्तक छिन्नभिन्न केले. मग ती लपून पाहणाऱ्या राजाला उद्देशून म्हणाली, "तुझे हे कृत्य अत्यंत निंद्य आहे. आज्ञा उल्लंघन करणाऱ्याला शासन झालेच पाहिजे. मल्लदेवा, तू आज माझी आज्ञा उल्लंघिली आहेस. आजपासून तू अगर तुझ्या वंशातील कोणीही पुरुष माझ्या दर्शनाला येऊ शकणार नाही. तुझ्या या राजवंशाला मी आता कायमची दुर्लभ झाले ! "

मल्लदेव गर्भगळित झाला. पुढे येऊन देवीचे पाय धरावे म्हणून तो नतमस्तक होतो, न होतो, तोच देवी अदृश्य झाली. त्या दिवसापासून त्या वंशातले राजे कामाख्येकडे पाठ फिरवून बसले. मग राजघराण्यातून पूजाअर्चा व्यवस्थित होईनाशी झाली. देवस्थानची सगळी व्यवस्था बिघडून गेली.

पुढे सतराव्या शतकात हा प्रदेश अहोम राजांच्या सत्तेखाली आला. त्यांपैकी एका शाक्तपंथी साधूने कामाख्यापीठाच्या पूजेअर्चेची व्यवस्था लावली. त्या दिवसापासून त्याला व त्याच्या शिष्यांना 'पर्वतीय गोसावी' अशी संज्ञा प्राप्त झाली. तेच आजमितीसही कामाख्या पीठाची व्यवस्था चालवीत आहेत.

कामाख्येचे पुरातन काळचे मंदिर नष्ट झाले. मुसलमानी

अमदानीत सोळाव्या शतकात हे मंदिर उद्ध्वस्त करण्यात आले. हल्लीचे मंदिर कुचबिहारचे महाराजा नरनारायण यांनी इ. स. १६६५ साली बांधले.

कामाख्या देवीला 'ललिताकांतिका' असेही नाव आहे. तिला 'त्रिपुरादेवी' असेही म्हणतात. तिची 'त्रिपुराबाला, त्रिपुरसुंदरी आणि त्रिपुरभैरवी' अशी तीन स्वरूपे आहेत.

आसामचे वैभव वाढविणारी ही कामाख्या देवी सर्वांना वरदायिनी ठरो.

**नमो देव्यै महादेव्यै शिवायै सततं नमः**
**नमः प्रकृतिभद्रायै नीयता प्रणतो ऽस्मि ताम् ॥**

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ४१३५३ दि: २५-६-१९७८
क्रमांक ३८३ नोंद दि: १५/१५८

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १५८२

## संदर्भसाहित्य


- ज्ञानकोश : संपादक. डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर
- माझी तीर्थयात्रा भाग १, २ : श्री. गोविंद हरी फडके
- दक्षिण हिंदुस्थानचा प्रवास : श्री. गोविंद हरी फडके
- भारतीय संस्कृति कोश १, २ व ३ : संपादक : पं. महादेवशास्त्री जोशी
- गुजरात (सांस्कृतिक परिचय) : पं. महादेवशास्त्री जोशी
- तामिळनाडु (सांस्कृतिक परिचय) : पं. महादेवशास्त्री जोशी
- कल्याण मासिक : तीर्थ विशेषांक
- माझा देश, माझे लोक : श्री. श्रीपाद जोशी
- भगवान कोणादित्य : श्री. आनंदयात्री
- माझा प्रवास : श्री. गोडसे भटजी
- भारतदर्शन : श्री. काका कालेलकर
- जीवनलीला : श्री. काका कालेलकर
- श्रीदत्तसंप्रदाय : श्री. रामचंद्र चिंतामण ढेरे
- श्रीनाथसंप्रदाय : श्री. रामचंद्र चिंतामण ढेरे
- अयोध्यामाहात्म्य : पं. नत्थूभट्टजी मढीकर
- हिंदुस्थानचे नंदनवन : श्री. गो. चिं. भाटे
- चारीधामयात्रेची माहिती : श्री. नारायण नानाजी पेटकर
- बारा गावचं पाणी : प्रा. वसंत बापट
- **Temples And Legends of Andhra Pradesh** : *Shree N. Ramesan*
- **Immortal India Parts 1 to IV** : *Shree G. H. Dave*
- **Bhavan's Journal** चे अनेक अंक
- **Department of Tourrism** ने प्रकाशित केलेल्या अनेक पुस्तिका
- **Die Kunst Indiens** : *Von Ervin Baktay*
- विविध क्षेत्र वर्णनपर पुस्तिका :